cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३१९ | मंगळवार दि.१७ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### अखेर मानवता जिंकली...!

केंद्र सरकारने पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत झालेली अटक रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. अहिंसक मार्गाने लढणाऱ्या नेतृत्वाची हिंसेच्या कारणासाठीची अटक रद्द झाली हे बरेच झाले. १७० दिवस उशिरा का होईना सरकारने काढलेले हे आदेश लडाख प्रदेशातील शांतता, स्थिरता मजबूत करण्यासाठी आणि सर्व पक्षांशी रचनात्मक संवादाला चालना देण्यासाठी उपयुक्त ठरोत.

# नमो शेतकरी महासन्मान हप्त्यासाठी निधी मंजूर

## लवकरच खात्यात होणार जमा, शासन निर्णय जारी

मुंबई । प्रतिनिधी

अखेर नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या आठव्या हप्त्याची प्रतिक्षा संपली आहे. राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या आठव्या हप्त्याच्या वितरणाला सोमवारी (दि.१६) मंजुरी दिली आहे. सरकारने आठव्या हप्त्यासाठी १ हजार ७७४ कोटी रुपयांचा निधी वितरणास मान्यता देणारा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. मागील तीन महिन्यांपासून शेतकरी नमोच्या हप्त्याची प्रतिक्षा करत आहेत.

नमोच्या सातव्या हप्त्याचे वितरण २०२५ च्या सप्टेंबर महिन्यात करण्यात आलें होते. राज्यातील ९१ लाख ६५ लाख १५६ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये १८९२ कोटी ६१ लाख रुपये जमा करण्यात आले होते. त्यानंतर आठवा हप्ता डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात जमा होणे अपेक्षित होते. परंतु वित्त विभागाने निधीच्या अडचणीमुळे नमोसाठी निधी मंजूर केलेला नव्हता. त्यामुळे शेतकरी नमोच्या आठव्या हप्त्याची प्रतीक्षा करत होते. पीएम किसान सन्मान निधी योजनेचा हप्ता वितरीत केल्यानंतर एका आठवड्यात त्याच लाभार्थ्यांना नमोचा हप्ता दिला जातो. त्यामुळे पीएम किसानच्या २१ व्या हप्त्यासोबत नमोचा आठवा हप्ता जमा होईल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. पीएम किसानचा २१ वा हप्ता नोव्हेंबर महिन्यात वितरीत करण्यात आला होता. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर २०२३ पासून वार्षिक ६ हजार रुपये शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला. यामध्ये तीन टप्प्यात २ हजार रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. आतापर्यंत या योजनेचे सात हप्ते वितरीत करण्यात आले आहे. राज्य सरकारने या योजनेसाठी नुकतेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी दोन स्वतंत्र लेखाशीर्ष तयार केले आहेत. दरम्यान, नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या आठव्या हप्त्यासाठी राज्य सरकारने निधी मंजूर केला आहे. लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा केली जाईल. परंतु अद्याप त्याबद्दलची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.



### एकच हप्ता मिळणार

नमोच्या आठव्या आणि नवव्या हप्त्याचे वितरण एकत्र केले जाईल, अशी चर्चा रंगली होती. परंतु राज्य सरकारने ऑगस्ट २०२५ ते नोव्हेंबर २०२५ दरम्यानचा म्हणजेच केवळ आठव्या या एकाच हप्त्याचे वितरण करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात...

### ममता बॅनर्जी विरुद्ध भाजपचे सुवेंदु अधिकारी

कोलकाता–

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षाने आपली पहिली मोठी खेळी खेळली आहे. भाजपने आज १४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून, यात सर्वात मोठे आकर्षण ठरले आहे ते म्हणजे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात सुवेंदु अधिकारी यांची झालेली निवड. विशेष म्हणजे, भाजपने सुवेंदु अधिकारी यांना एकाच वेळी दोन महत्त्वाच्या मतदारसंघांतून मैदानात उतरवले आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या सध्या भवानीपूर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. भाजपने याच हाय–प्रोफाइल जागेवर आपले फायरब्रँड नेते सुवेंदु अधिकारी यांना उमेदवारी देऊन थेट आव्हान दिले आहे. यामुळे भवानीपूरमधील लढत आता संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेणारी ठरणार आहे.

### नागपूर कन्व्हेन्शन सेंटरमध्ये लवकरच बाबासाहेबांचा पुतळा

मुंबई :–

नागपूर येथे उभारण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा उभारण्यात येत आहे. येत्या दोन महिन्यात या पुतळ्याचे काम पूर्ण होईल. तसेच विद्यार्थ्यांसाठी एआय–आधारित डिजिटल सुविधा सुरू करण्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानसभेत दिली. सदस्य नितीन राऊत यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना मंत्री शिरसाट बोलत होते. या चर्चेत सदस्य राजकुमार बडोले यांनीही सहभाग घेतला. मंत्री संजय शिरसाट म्हणाले, नागपूरमध्ये उभारण्यात आलेल्या कन्व्हेन्शन सेंटरसाठी सुमारे १४० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या संकुलात ऑडिटोरियम हॉल, बँक्वेट हॉल, प्रशिक्षण हॉल, डॉरमेटरी, मिनी कॉन्फरन्स हॉल, गेस्ट रूम आदी सुविधांचे काम पूर्ण झाले असून त्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत.

### राजू बाविस्कर यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

नवी दिल्ली :–

साहित्य अकादमीने सोमवारी (दि. १६ मार्च) २४ भारतीय भाषांमधील आपले वार्षिक पुरस्कार जाहीर केले आहेत. यामध्ये आत्मचरित्र श्रेणीत राजू बाविस्कर यांच्या कळ्यानिळ्या रेषा पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. यंदा प्रतिष्ठित सन्मानासाठी आठ काव्यसंग्रह, चार कादंबऱ्या, सहा कथासंग्रह, दोन निबंधात्मक कार्ये, एक साहित्यिक समीक्षा, एक आत्मचरित्र आणि दोन आठवणींच्या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे.



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २१६.५० क्विंटल | २,००० | २,६०० | २,२६८ |
| ज्वारी/हायब्रिड: १९४.०० क्विंटल | २,००० | ५,००१ | ३,४७४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,५०१ | ७,५०१ | ७,५०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,१०१ | २,७६० | २,५२२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ५,१५० | ५,१५० | ५,१५० |
| हरभरा: २६.०० क्विंटल | ५,००० | ५,११५ | ५,०३५ |

# केजजवळ ट्रॅव्हल्स बसचा भीषण अपघात

## आग लागून ट्रॅव्हल्स खाक, २५ प्रवासी गंभीर जखमी

बीड : प्रतिनिधी

जळगाववरून लातूरकडे जाणाऱ्या प्रवाशांनी भरलेल्या ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात झाला आहे. अपघातानंतर या बसने पेट घेतला आणि सगळीकडे आगीने रौद्ररूप धारण केले. या आगीत प्रवाशांच्या सामानाचे नुकसान झाले असून २५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या

◀◀ पान २ वर




# एलपीजी घेवून शिवालिक जहाज गुजरातमध्ये दाखल

नवी दिल्ली । प्रतिनिधी

मध्य पूर्वेतील तणावामुळे गॅस टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात असतानाच, युद्धजन्य परिस्थिती असलेल्या हॉर्मुझची सामुद्रधुनी पार करून शिवालिक हा एलपीजी टँकर गुजरातच्या मुंद्रा बंदरात सुखरूप दाखल झाला आहे.

भारतीय ध्वज असलेली शिवालिक आणि नंदा देवी ही दोन जहाजे लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस घेऊन येत होती. इराणच्या अधिकाऱ्यांनी या दोन्ही जहाजांना हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करण्याची परवानगी दिली होती. शिपिंग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी शनिवारी माहिती दिली होती की, शिवालिक

◀◀ पान २ वर



# बायपास शस्त्रक्रिया आता मोफत सभागृहात आरोग्यमंत्र्यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील रुग्णालयांमध्ये अनेकांना महात्मा फुले आरोग्य योजनेचा व्यवस्थितपणे लाभ मिळत नसल्याचा मुद्दा सोमवारी भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सभागृहात उपस्थित केला. यावेळी लोणीकर यांनी शिवसेनेचे आमदार आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना जाब विचारला. आमच्या मतदारसंघातील एका व्यक्तीला बायपासच्या शस्त्रक्रियेसाठी महात्मा फुले योजना आणि आयुषमान भारत योजनेचा लाभ मिळत नाही. योजनेच्या निकषापेक्षा त्या व्यक्तीला कमी पैसे मिळत असल्याची तक्रार बबनराव लोणीकर यांनी केली. यावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मला महात्मा फुले आरोग्य योजनेच्या निकषांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांचे नाव सांगावे. मी तात्काळ त्यांच्यावर कारवाई करतो, असे आश्वासन दिले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी सभागृहात हा मुद्दा जोरकसपणे लावून धरला. मंत्री महोदय आपल्या

◀◀ पान २ वर



# बारामतीत 'पवार विरुद्ध पवार' होणार नाही!

## सुप्रिया सुळे यांची मोठी घोषणा

दिल्ली । वृत्तसंस्था


बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल ही तारीख जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी स्पष्ट केले की, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार उभा करण्याचा प्रश्नच येत नाही. ''आम्ही सुनेत्रा वहिनींविरोधात कधीही उमेदवार देणार नाही. महाविकास आघाडीही असेच करेल,'' असे सुळे यांनी नवी दिल्लीत पत्रकारांशी

◀◀ पान २ वर



# अहमदाबाद विमान दुर्घटनेत खरी माहिती लपविली ?

## पुरावे दडपल्याचा अमेरिकन संस्थेचा खळबळजनक दावा



न्यूयॉर्क । वृत्तसंस्था

२०२५ जून मध्ये अहमदाबादजवळ घडलेल्या एअर इंडिया विमानाच्या दुर्घटनेच्या तपासावर नव्याने प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. अमेरिकेतील विमान सुरक्षा क्षेत्रातील संस्थेने या दुर्घटनेशी संबंधित काही महत्त्वाची कागदपत्रे तपास यंत्रणांपासून लपवली. दुर्घटनेत एकूण २६० जणांचा मृत्यू झाला होता, असा आरोप केला आहे.

अमेरिकास्थित फाऊंडेशन फॉर एव्हिएशन सेफ्टीचे कार्यकारी संचालक एड पिअर्सन यांनी तपास अधिकाऱ्यांना आणि देखरेख संस्थांना पाठविलेल्या ई–मेलमध्ये हा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या मते, संस्थेला काही गोपनीय आणि सार्वजनिक न झालेली कागदपत्रे

◀◀ पान २ वर



पुणे :महाराष्ट्र राज्याचे माजीआरोग्य मंत्री ''भूम परंडा वाशी' मतदारसंघाचे आमदार, ''मराठा भूषण प्रा. डॉ. तानाजीराव सावंत साहेब यांना वाढदिवसानिमित्त कात्रज पुणे येथील कार्यालयात शुभेच्छा देऊन आशीर्वाद घेताना छावा संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक रोमन सोबत छावा मित्रपरिवार.

# शेतकरी–शेतमजुरांना मातृत्व रजेचा लाभ द्या



नागपूर । प्रतिनिधी

असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिला शेतकरी व शेतमजुरांना मातृत्व रजेचा (मॅटर्निटी लीव्ह) लाभ देण्याची मागणी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी विजय जावंधिया यांनी केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की देशातील संघटित क्षेत्रातील महिलांना प्रसूतीसाठी २६ आठवड्यांची सवेतन रजा देण्याची तरतूद आहे. अनेक खासगी कंपन्यांमध्ये देखील हा नियम लागू करण्यात आला आहे. मात्र ग्रामीण भागात शेती व शेतीपूरक कामात गुंतलेल्या असंघटित महिला शेतकरी आणि शेतमजुरांना असा कोणताही लाभ मिळत नाही. ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा मोठा वाटा असून शेतीमधील बहुतांश कामे महिलांकडून केली जातात. तरीही

### सहा महिन्यांचे मानधन देण्याची तरतूद करा

यासाठी मनरेगा योजनेतील किमान मजुरीच्या आधारावर सहा महिन्यांचे मानधन देण्याची तरतूद करावी. ग्रामीण भागातील महिला शेतकरी व शेतमजुरांच्या आरोग्य आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, राज्य सरकारने या मागणीची दखल घेऊन असंघटित क्षेत्रातील महिलांना मातृत्व संरक्षण देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

सस्नेह निमंत्रण

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

## ५ वा वर्धापन दिन समारंभ

गुढीपाडव्याच्या पवित्र आणि शुभमुहूर्तावर दैनिक राज्य लोकतंत्र आपला पाचवा वर्धापन दिन साजरा करत आहे. हा क्षण आमच्यासाठी केवळ उत्सवाचा नाही, तर कृतज्ञतेचा, अभिमानाचा आणि नव्या संकल्पांचा आहे.

गेल्या पाच वर्षाचा प्रवास सोपा नव्हता. अनेक आव्हानं, अनेक वळणं आली... मात्र प्रत्येक टप्प्यावर सामान्य वाचकांचा विश्वास, हितचिंतकांचे मोलाचे आशीर्वाद आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेवर ठेवलेली श्रद्धा यामुळेच दैनिक राज्य लोकतंत्र आज या उंचीवर उभं आहे. केवळ बीड जिल्हा नाही तर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पुणे अहिल्यानागर या भागात देखील विस्तार झाला.

शेती आणि शेतकरी हा आमच्या लेखणीचा श्वास आहे. मातीशी नाळ जोडलेली, घामाच्या थेंबांना शब्द देणारी आणि शेतकऱ्यांच्या वेदना समाजासमोर मांडणारी हीच आमची ओळख आहे. सहाव्या वर्षात पाऊल टाकताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. त्यातच २०२६ हे जागतिक महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे होत असल्याने, शेती सांभाळणाऱ्या, कुटुंब उभं करणाऱ्या आणि देशाच्या अन्नसुरक्षेची धुरा वाहणाऱ्या शेतकरी मायलेकींना वंदन करण्याचा हा योग आमच्यासाठी दुग्धशर्करेसारखा गोड आहे. या आनंदाच्या क्षणी, दिनांक १९ मार्च गुढीपाडव्याच्या दिवशी आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमास आपली उपस्थिती आमच्यासाठी सन्मानाची आणि प्रेरणादायी ठरेल. आपण आवर्जून यावे, आमच्या आनंदात सहभागी व्हावे, हीच नम्र आणि मनापासून विनंती.

● आपले स्नेहांकित ●

सौ.सीमा मस्के (मोकाशे) – संपादक
गणेश मोकाशे – संचालक संपादक
संजीव ओक – पुणे आवृत्ती प्रमुख
सुभाष चौरे – कार्यकारी संपादक
अनिल जाधव – मुख्य उपसंपादक
विशाल साळुंके – उपसंपादक
दिलीप शिंगाडे – व्यवस्थापक

मुख्य कार्यालय ऑफीस क्र.५, सुखवानी फोर्च्यून, घरोंदा रेसिडेन्सी, मोरवाडी, पिंपरी (चिं.), पुणे

बीड कार्यालय : जाधव बिल्डींग, राजीव गांधी चौक, बीड ४३११२२

दि.१९ मार्च २०२६, वेळ : सायंकाळी ५ ते १०

स्थळ : हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड

cmyk

## अग्रलेख

# अखेर मानवता जिंकली...!

केंद्र सरकारने पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत झालेली अटक रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. अहिंसक मार्गाने लढणाऱ्या नेतृत्वाची हिंसेच्या कारणासाठीची अटक रद्द झाली हे बरेच झाले. १७० दिवस उशिरा का होईना सरकारने काढलेले हे आदेश लडाख प्रदेशातील शांतता, स्थिरता मजबूत करण्यासाठी आणि सर्व पक्षांशी रचनात्मक संवादाला चालना देण्यासाठी उपयुक्त ठरोत. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रदीर्घ कालावधीच्या पुढची तारीख देण्याच्या कामकाजानंतर याची कोर्टात सुनावणी होणार असताना सरकारने ही सुटका केली आहे. लडाखसह संपूर्ण प्रदेशाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलली जातील असे सरकारने स्पष्ट केले. २४ सप्टेंबर २०२५ रोजी लेह येथे राज्याचा दर्जा आणि संविधानातील सहाव्या अनुसूचीत समावेश करण्याच्या मागणीसाठी हिंसक निदर्शने झाली होती. त्यात चार जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जखमी झाले. २६ सप्टेंबरला सोनम वांगचुक यांना अटक करण्यात आली होती. आता तो निर्णय मागे घेण्यात आला आहे. हा या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने हिमालयाएवढा मोठा विजय आहे. तो केवळ एका कार्यकर्त्याची मुक्तता नव्हे तर पर्यावरण संरक्षणाच्या अहिंसक लढ्याचा संवैधानिक हक्कांचा आणि भारतीय हिमालयीन वारशाचा विजय आहे.

सोनम वांगचुक यांचा जन्म १९६६ साली लडाखच्या अलची या छोट्या गावात झाला. त्यांनी श्रीनगर येथील राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थेतून यांत्रिकी अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली. वयाच्या बावीसाव्या वर्षी त्यांनी विद्यार्थी शैक्षणिक आणि सांस्कृतिक चळवळ ही संस्था स्थापन केली. लडाखी विद्यार्थ्यांना इतर भाषांच्या माध्यमातून शिक्षण दिल्यामुळे ९९ टक्के विद्यार्थी अपयशी होत होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वत: चालवलेल्या शाळा उभ्या केल्या. या शाळांमध्ये सौरऊर्जेने गरम केल्या जाणाऱ्या मातीच्या इमारती बांधल्या गेल्या. येथे विद्यार्थी स्वत: प्रशासन चालवतात. वृत्तपत्र आणि रेडिओ चालवतात. आज ही चळवळ हजारो युवकांना स्वावलंबी आणि सर्जनशील बनवते. २०१५ साली त्यांनी हिमालयीन पर्याय संस्था सुरू केली. येथे पर्वतीय वास्तवाशी सुसंगत उच्च शिक्षण दिले जाते. २०१३ साली सोनम वांगचुक यांनी हिम स्तूप तंत्र विकसित केले. हे तंत्र हिवाळ्यातील व्यर्थ जाणारे पाणी एका शंकूच्या आकारात गोठवून साठवते. हिवाळ्यात हिमनद्यांमधून येणारे पाणी पाईपद्वारे वर फवाऱ्या सारखे उडवले जाते. थंड हवेने ते गोठते आणि शंकू आकारात बर्फ जमा होते. हा शंकू बौद्ध स्तूपासारखे दिसतो. उन्हाळ्यात फक्त बाहेरील थोडासा भाग वितळतो आणि पाणी हळूहळू शेतीसाठी उपलब्ध होते. एक छोटा स्तूप दीड लाख लिटर पाणी साठवतो तर मोठे स्तूप कोट्यावधी लिटर साठवतात. आज लडाखमध्ये बावन्नहून अधिक असे स्तूप कार्यरत आहेत. जगातील चौदा ठिकाणी हे तंत्र लागू झाले आहे. हे तंत्र हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी स्थानिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान एकत्र करते. लडाखच्या शेतकऱ्यांना पाणी मिळते. पशुपालन आणि पर्यावरण संरक्षण मजबूत होते. भारताच्या नद्या कृषी आणि सीमावर्ती स्थिरता यासाठी हे तंत्र अपार उपयोगाचे ठरते.सोनम वांगचुक यांचे कार्य केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नाही. त्यांनी २०१४ साली एकवीस दिवसांचा उपवास केला. २०१४ साली राज्याचा दर्जा आणि सहाव्या अनुसूचीसाठी पदयात्रा केली. त्यांना जागतिक पुरस्कार मिळाले. मात्र आंदोलनानंतर काही समाज माध्यमातील कंटकांनी त्यांच्या भाषणाचा चुकीचा अर्थ पसरवून त्यांना या राष्ट्रीय सुरक्षा कायदा खालील गुह्यात गुंतवता येईल अशी परिस्थिती निर्माण केली. काही उतावळ्या माध्यमांनी देखील त्यांना देशद्रोही ठरवण्याचा विडा उचलला आणि विनाकारण एका ज्ञानी व्यक्तीला तुरुंगात खितपत पडावे लागले. ते नेहमी गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गावर चालतात. २०२५ साली लेह येथील निदर्शनांनंतर त्यांना जोधपूरच्या केंद्रीय कारागृहात ठेवण्यात आले. चार ऑक्टोबरला त्यांचा मोठ्या भाऊ आणि वकिलाने भेट घेतली. सोनम वांगचुक यांनी कारागृहातून संदेश पाठवला. ते म्हणतात, मी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या पूर्ण ठीक आहे. सर्वांच्या काळजी आणि प्रार्थनांसाठी मनापासून आभार. ज्यांनी जीव गमावला त्यांच्या कुटुंबीयांना संवेदना. जखमी आणि अटक झालेल्यांसाठी प्रार्थना. चार मृत्यूंची स्वतंत्र न्यायिक चौकशी होणे आवश्यक आहे. जोपर्यंत ती होत नाही तोपर्यंत मी कारागृहात राहण्यास तयार आहे. लडाखच्या सहाव्या अनुसूचीत समावेश आणि विशेष राज्याचा दर्जा या मागणीत माझा पूर्णपणे सहभाग आहे. लडाखच्या लोकांच्या हितासाठी सर्वोच्च संस्था जी पावले उचलेल त्याचे मी समर्थन करतो. लोकांनी शांतता आणि एकता राखावी. गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गावर शांततेने लढा सुरू ठेवावा. हा संदेश हिमालयी शांततेचा आणि समर्पणाचा आहे. लडाखमध्ये सोनम वांगचुक यांच्यासोबत अनेक कार्यकर्ते सक्रिय आहेत. लडाख शिखर संस्थेचे अध्यक्ष थुपस्टन छेवांग हे ज्येष्ठ नेते आहेत. १९९० पासून ते लडाखच्या हक्कांसाठी लढत आहेत. त्यांच्यासोबत चेरिंग दोरजे लक्रुक हे उच्चाधिकार समिती सदस्य आहेत. ते सहाव्या अनुसूचीसाठी आवाज उठवतात. कारगिल लोकशाही संघटनेचे सज्जाद कर्गिली हे कारगिल भागातील मुस्लिम बहुसंख्य कार्यकर्ते आहेत. ते एकता आणि संवादासाठी प्रयत्न करतात. लडाख बौद्ध संघटनेचे त्सेरिंग दोरजे हे शांतता राखण्याचे काम करतात. महिला कार्यकर्त्या डिस्किट गंगजोर आणि नार्डन शुनु यांनी सांस्कृतिक ओळख आणि महिलांच्या हक्कांसाठी आवाज दिला. सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली आंगमो हिमालयीन पर्याय संस्थेच्या सहसंस्थापक आहेत. त्या शिक्षण आणि पर्यावरण क्षेत्रात सक्रिय आहेत. रिगझिन स्पालबार आणि मोहम्मद हनीफा हे लोकसभा प्रतिनिधी संवादासाठी प्रयत्न करतात. लडाखच्या बौद्ध आणि मुस्लिम समाजातील एकता हे या लढ्याचे वैशिष्ट्य आहे. हे सर्व कार्यकर्ते अहिंसक मार्गांनी लढतात. वांगचुक हे हिमालयाचे खरे रक्षक आहेत. त्यांचे हिम स्तूप तंत्र जलसंकट आणि हवामान बदलाविरुद्धचे क्रांतिकारी उपाय आहे. विद्यार्थी चळवळ आणि हिमालयीन पर्याय संस्थेने युवकांना सर्जनशील बनवले. सोनम वांगचुक यांचे कार्य भारतासाठी समर्पित आहे. त्यांनी लाखो भारतीयांना पाणी शिक्षण आणि आशा दिली. आंतरराष्ट्रीय विद्वान संशोधक आणि पर्यावरण कार्यकर्त्यांनी सोनम वांगचुक यांच्या कामाचे मोठे कौतुक केले. जागतिक नियतकालिकांनी त्यांना हवामान रक्षक म्हणून गौरवले. हिमालयाचे रक्षक सोनम वांगचुक मुक्त झाले आहेत. हा विजय भारताच्या हिमालयीन भविष्याचा आहे.

# एकनाथ शिंदेंचा अचानक दिल्ली दौरा!

## जिल्हा परिषदांमध्ये डावलल्याने शिवसेना आक्रमक

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील राजकारणात मोठी हालचाल घडताना दिसत असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोमवारी अचानक दिल्लीला रवाना झाले. त्यांच्या या अचानक दिल्ली दौऱ्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, या दौऱ्यात शिंदे भाजपचे अध्यक्ष नितीन नबीन तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत. राज्यातील काही जिल्हा परिषदांमध्ये शिवसेना शिंदे गटाला सत्तेपासून दूर ठेवले जात असल्याच्या तक्रारी स्थानिक नेत्यांकडून होत आहेत. त्यामुळे पक्षात नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याची चर्चा आहे. विशेषतः रायगडमध्ये बहुमत असूनही तडजोड करावी लागली, तर फलटणमध्ये शिवसेनेला सत्तेत सहभागी करून घेण्यात आले नसल्याची खंत स्थानिक शिवसैनिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी शिंदे यांनी दिल्लीचा दौरा केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांदरम्यान भाजपने अनेक ठिकाणी शिवसेना शिंदे गटाला धक्का दिला होता. त्या वेळी शिंदे गटातील काही पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळेही पक्षात नाराजी वाढली होती. त्यानंतर महापालिका निवडणुकीपूर्वीही शिंदे यांनी दिल्ली दौरा केला होता. त्या भेटीनंतर भाजप आणि शिवसेना शिंदे गटामध्ये अनेक ठिकाणी युती झाली आणि दोन्ही पक्षांनी एकमेकांच्या कार्यकर्त्यांना पक्षात प्रवेश देऊ नये, असा निर्णय घेतला होता. महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही पक्षांना चांगले यश मिळाले. काही ठिकाणी शिवसेना शिंदे गटाचा महापौर झाला, तर काही ठिकाणी भाजपचा महापौर झाला. त्यानंतर झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही दोन्ही पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवली होती. मात्र, निकालानंतर काही ठिकाणी शिवसेना शिंदे गटाला सत्तेत सहभागी करून घेतले जात नसल्याचा आरोप होत आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांचा दिल्ली दौरा राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे.

# वातावरणातील बदलामुळे अंबा बागेच्या नुकसानीचे पंचनामे करा

## दादासाहेब चव्हाण यांची जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी

मंठा । प्रतिनिधी

वातावरणातील अचानक झालेल्या बदलामुळे आंबा बागेचे अतोनात नुकसान झाले असून नुकसान झालेल्या बागेची तात्काळ पाहणी करून पंचनामा करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य आंबा बागायतदार संघाचे विभाग प्रमुख दादासाहेब चव्हाण यांनी मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.



निवेदनात पुढे म्हटले आहे की, वातावरणात अचानक झालेला बदलाचा फटका आंबा पिकाला बसला असून आंबा मोहोर व फळांची मोठ्या प्रमाणात गळ झाल्याने आंबा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. कोकण विभागात आंबा बागांचे पंचनामे करून नुकसान भरपाईची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे; मात्र उर्वरित महाराष्ट्रातील आंबा बागायतदारांचेही मोठे नुकसान झाले असतानाही त्या भागाकडे अद्याप अपेक्षित लक्ष गेलेले दिसत नाही. त्यामुळे या भागातील नुकसानीची दखल घेऊन शासनाने पंचनामे करून मदत करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले आहे. हवामानातील सततच्या बदलांमुळे मोहोर गळणे आणि लहान फळांची गळ होणे या समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. परिणामी अनेक ठिकाणी झाडांवर अवघे दहा टक्केच फळ शिल्लक राहिल्याचे चित्र दिसून येत असून आंबा बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे आपण स्वतः याबाबत लक्ष घालून जिल्हाभरतील आंबा बागेची पाहणी करून तात्काळ पंचनामे करावे जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळेल या दृष्टीने प्रयत्न करावे अशी मागणी केली आहे.

# कपिलधार येथे शिवसंग्रामची जिल्हा कार्यकारणी बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**शिवसंग्राम पक्षाची जिल्हा कार्यकारणी बैठक आज बीड तालुक्यातील कपिलधार येथे शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. आगामी ग्रामपंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका आणि संघटनात्मक बांधणी या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती.**



या बैठकीस शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, मराठवाडा अध्यक्ष अनिल घुमरे, ज्येष्ठ नेते सुभाष जाधव, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, शहराध्यक्ष सुहास पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी संघटनेची प्रगती ही कार्यकर्त्यांच्या सक्रियतेवर अवलंबून असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांनी गावोगाव तसेच वाडी-वस्त्यांपर्यंत संघटनेचे जाळे अधिक मजबूत करावे आणि स्वर्गीय मेटे साहेबांच्या विचारांचा वसा व वारसा समर्थपणे पुढे न्यायावा, असे त्यांनी आवाहन केले. तसेच आजही वाडी-तांड्यावर मेटे साहेबांचा विचार खोलवर रुजलेला असून आगामी काळात ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसंग्राम अधिक जोमाने काम करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या ताकदीशिवाय कोणीही निवडून येणार नाही, असा ठाम विश्वासही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. बैठकीत संघटनात्मक मजबुती, आगामी निवडणुकांची रणनीती आणि कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# नारी शक्ती तुमच्या कर्तृत्वाला सलाम –वर्षाताई जगदाळे



बीड । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ''नारी शक्ती तुमच्या कर्तृत्वाला सलाम'' या प्रेरणादायी ब्रीदवाक्याखाली म्हाळसा महिला प्रतिष्ठानच्या वतीने आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संकल्पनेतून बीड शहरात भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या पुढाकारातून हॉटेल ओलिओ येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला महिला व मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत शहरासह जिल्ह्यातील अनेक महिला व मुलींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या नृत्यकलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. महिलांच्या कलेला आणि कर्तृत्वाला व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढावा हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

पान १ वरून...

### केजजवळ ट्रॅव्हल्स बसचा

रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, एक खासगी ट्रॅव्हल्स जळगाववरून लातूरकडे जात होती. ही ट्रॅव्हल्स केज - मांजरसुंबा रोडवर पहाटे २.४५ वाजता केजपासून जवळ सांगवी ते पिंपळगाव फाट्यावर पलटी झाली. त्यानंतर बसने अचानक पेट घेतला. काही वेळातच आगीचे लोळ सर्वत्र पसरले. चालकाच्या अतिवेगामुळे हा अपघात घडल्याचे म्हटले जात आहे. या दुर्घटनेत २५ प्रवासी गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच अपघातस्थळी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार आणि सहाय्यक पोलिस उपनिरक्षक शंभुदेव दराडे दाखल झाले. अपघातग्रस्त प्रवाशांना ट्रॅव्हल्स मधून बाहेर काढले असून, पोलिस प्रशासन व रुग्णवाहिका यांच्या मदतीने उपजिल्हा रुग्णालय केज येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघातात प्रवाशांचे सामान जळून खाक झाले. काहींची महत्त्वाची कागदपत्र देखील गहाळ झाली. या दुर्घटनेनंतर प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्मण झाले.

### एलपीजी घेवून शिवालिक

आणि नंदा देवी ही जहाजे अनुक्रमे १६ आणि १७ मार्च रोजी भारतात पोहोचण्याची शक्यता आहे. सिन्हा म्हणाले, पर्शियन गल्फ प्रदेशातील सर्व भारतीय खलाशी सुरक्षित आहेत आणि गेल्या २४ तासांत कोणतीही अनुचित घटना घडलेली नाही. पर्शियन गल्फमध्ये भारताचे ध्वज असलेली एकूण २४ जहाजे होती. त्यापैकी शिवालिक आणि नंदा देवी या दोन गॅस वाहक जहाजांनी हॉर्मुझची सामुद्रधुनी पार केली.

### शेतकरी-शेतमजुरांना

प्रसूतीच्या काळात त्यांना कोणतीही आर्थिक मदत किंवा सवेतन रजा उपलब्ध नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे या महिलांनाही किमान २६ आठवड्यांची सवेतन मातृत्व रजा देण्याची योजना शासनाने सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्यसभा सदस्य सुधा मूर्ती यांना देखील विजय जावंधिया यांनी या संदर्भात निवेदन पाठविले आहे. त्यानुसार, सुधा मूर्ती यांनी शेतकरी, शेतमजूर महिलांच्या मातृत्व रजेचा मुद्दा राज्यसभेत उपस्थित करावा. त्यासोबतच राष्ट्रपती यांनीदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे ही मागणी मान्य करण्यासाठी आग्रही भूमिका घ्यावी, असे नमूद करण्यात आले आहे.

### अहमदाबाद विमान

मिळाली असून त्यातून दुर्घटनाग्रस्त विमानात यापूर्वी अनेक गंभीर विद्युत बिघाड झाले होते, असे दिसून येते. दुर्घटनाग्रस्त विमान हे बोईंग ७८७ ड्रीमलाइनर प्रकारातील होते आणि त्याचा नोंदणी क्रमांक व्हीटी-एएनबी होती. हे विमान १२ जून २०२५ रोजी कोसळले. पिअर्सन यांच्या म्हणण्यानुसार, या विमानात पूर्वी धूर व दुर्गंधी निर्माण होणे, वायरिंग जळणे, शॉर्टसर्किट, स्पार्किंग आणि अगदी विद्युत आगीसारखे गंभीर प्रकार घडले होते. त्यांच्या ई-मेलमध्ये नमूद केले. आहे की, विमानातील पी १०० पॉवर पॅनल नावाचा महत्त्वाचा विद्युत घटक अनेकदा बिघडला होता. परिणामी, विमानाला अनेक वेळा ग्राऊंड करण्यात आले आणि हा पॅनल तीन वेळा बदलावा लागला. सुरक्षा संस्थेच्या आरोपानुसार, या समस्यांशी संबंधित कागदपत्रे दुर्घटनेपूर्वी आणि नंतरही एअर इंडिया आणि बोईंग यांच्या नियंत्रणात होती; मात्र ती तपासकर्त्यांना देण्यात आली नाहीत.

भारताच्या तपास ब्युरोने जुलै २०२५ मध्ये जाहीर केलेल्या प्राथमिक अहवालातही या बाबींचा उल्लेख नसल्याचे पिअर्सन यांनी सांगितले. तसेच दुर्घटनेनंतर नऊ महिने उलटूनही कोणत्याही सुरक्षाविषयक शिफारशी जाहीर झाल्या नाहीत, याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यांच्या मते, या माहितीच्या अभावामुळे पायलटांच्या चुकीलाच जबाबदार ठरविण्याची कथा अधिक बळकट झाली आहे. या संस्थेने असा दावा केला आहे की, पायलट त्रुटीऐवजी विमानातील संभाव्य तांत्रिक दोषही दुर्घटनेचे कारण असू शकतात.

### बायपास शस्त्रक्रिया

विभागाचे काम चांगले होत आहे. पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री महोदयांनी या देशातील राज्यातील आणि देशातील १०० कोटी लोकांसाठी आयुषमान भारत योजना आणली आहे. राज्य सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना आणली आहे. या दोन्ही योजना एकत्र आहेत. आमचे विठ्ठल कदम नावाचे शेतकरी आहेत. त्यांची बायपास शस्त्रक्रिया करायी आहे. या शस्त्रक्रियेसाठी एका व्यक्तीला ११ लाख रुपये लागतात. सहा लाख रुपये केंद्र आणि राज्य सरकारकडून बायपासच्या शस्त्रक्रियेसाठी दिले जातात. पण त्यांना फक्त १ लाख रुपये मिळत आहेत. बायपासला एक लाख रुपयात होत नाही, दोन महिन्यांपासून ऑपरेशन थांबले आहे. त्याच्यामुळे केंद्राचे ३ लाख आणि राज्याचे ३ लाख असतानाही फक्त विठ्ठल कदम यांना एक लाख रुपये मंजूर करु, असे सांगितले आहे. त्यामुळे सहा लाख रुपये या लाभार्थ्यांना देणार का, असा प्रश्न बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला.

यावर उत्तर देताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटले की, अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्य लोणीकर साहेबांनी जो प्रश्न विचारला, आमच्या योजनांमध्ये एक लाख रुपयांची गरज नाही. आमच्या योजनेत बायपास आणि अन्य शस्त्रक्रियांचे निकष स्पष्ट आहेत. आम्ही आयुषमान भारत जेव्हा आमच्याबरोबर जोडली तेव्हा आमच्या चार्जेसमध्ये वाढ झाली. त्यामुळे कुठल्याही रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी एक रुपयाही देण्याची गरज नाही. त्यामुळे असं कुठलं हॉस्पिटल करत असेल तर सांगा. आपण प्राथमिक आरोग्य केंद्रापासून, ग्रामीण रुग्णालयात, उपजिल्हा रुग्णालयात आपण ही योजना प्रभावीपणे आपापल्या मतदारसंघात प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

### बारामतीत 'पवार विरुद्ध

बोलताना सांगितले. जानेवारी महिन्यात विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याने बारामती विधानसभेची जागा रिक्त झाली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष या जागेवरून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देणार असल्याचे जवळपास निश्चित आहे, मात्र अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. सुनेत्रा पवार सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत. त्या विधानसभेवरही निवडून आलेल्या नसल्याने घटनात्मक तरतुदीनुसार सहा महिन्यांच्या आत त्यांना निवडणूक जिंकणे आवश्यक आहे. बारामती हा अजित पवार यांचा बालेकिल्ला होता. त्यांनी या जागेवर सलग आठ वेळा विजय मिळवण्याचा विक्रम केला होता. सुप्रिया सुळे या अजित पवार यांच्या चुलत बहीण आहेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने अजित पवार यांच्याविरोधात त्यांचे पुतणे युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली होती. मात्र युगेंद्र पवार एक लाखांहून अधिक मतांच्या फरकाने पराभूत झाले होते.

पान ६ वरून...

### अंबाजोगाईत महिला क्रिकेटची

देऊन गौरविण्यात आले. . या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.राजेश इंगोले म्हणाले की, माही परमार यांना मी खूप जवळून ओळखतो.

माही परमार या क्रिकेट क्षेत्रात अनेक वर्षांपासून सक्रिय असून महिला क्रिकेटच्या विकासासाठी त्या सातत्याने कार्य करत आहेत. त्या एक कुशल क्रिकेट प्रशिक्षिका म्हणून अनेक तरुण खेळाडूंना प्रशिक्षण देत आहेत. त्याचबरोबर त्या क्रीडा पत्रकारितेतही उल्लेखनीय काम करत असून महाराष्ट्र स्पोर्ट्स या न्यूज चॅनेलच्या संपादक म्हणून कार्यरत आहेत. तसेच स्पोर्ट्स प्लस या दैनिकामध्ये महाराष्ट्र महिला क्रिकेट प्रतिनिधी प्रमुख म्हणून त्या जबाबदारी पार पाडत आहेत. महिला क्रिकेटला योग्य व्यासपीठ मिळावे, महिला खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्याला व्यापक प्रसिद्धी मिळावी यासाठी माही परमार सातत्याने प्रयत्न करत असतात. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन त्या महिला क्रिकेटच्या विकासासाठी मार्गदर्शन करत आहेत. अनेक नवोदित महिला खेळाडूंना त्यांनी प्रेरणा दिली असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक खेळाडूंना पुढे जाण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्रभर महिला क्रिकेटच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय मानले जाते. क्रिकेट प्रशिक्षिका, क्रीडा पत्रकार आणि क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्त्या या तिन्ही भूमिकांमध्ये त्यांनी सातत्याने काम करत महिला क्रिकेटला बळकटी देण्याचे काम केले आहे. त्यामुळेच त्यांच्या या कार्याची दखल घेत अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला

त्या अत्यंत मेहनतीने आणि जिद्दीने क्रिकेट क्षेत्रात काम करत आहेत. महिला क्रिकेटच्या उभारणीसाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. महाराष्ट्रभर महिला क्रिकेटमध्ये त्यांचे नांव आदराने घेतले जाते. त्यांनी अनेक महिला खेळाडूंना प्रेरणा दिली आहे. भविष्यात अंबाजोगाईसारख्या शहरालाही त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा निश्चितच मोठा फायदा होईल. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने माही परमार यांना मिळालेला हा सन्मान हा त्यांच्या कार्याचा उचित बहुमान असल्याचे सांगत हा पुरस्कार त्यांना भविष्यातही अशाच प्रकारचे क्रीडा कार्य करण्याची प्रेरणा देईल अशी अपेक्षा डॉ.इंगोले यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही माही परमार यांच्या कार्याचे कौतुक केले. महिला क्रिकेटच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे सर्वांनी अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सन्मान सोहळ्यावेळी राजकिशोर मोदी, निलेश मुथा,पोलीस निरीक्षक शरद जोगदंड , प्रेमलता मूथा, अनितोष कातकडे, अविनाश साठे, साहेबा लोंढे, जयकुमार लोढा, सतीश बालुतकर, डॉ.संदीप जैन, अक्षय परदेशी, अभिजित जोधळे, प्रतीक बोथरा, ऋषभ रांका आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी, खेळाडू आणि नागरिक उपस्थित होते. अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या या उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असून भविष्यातही अकॅडेमीने क्रीडा स्पर्धा आणि सन्मान सोहळे आयोजित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहित परमार,सूत्रसंचलन अशोक तापडिया तर आभार प्रदर्शन निलेश मुथा यांनी केले.

### कवडगाव बु येथे दोन ठिकाणी

केले व विरोध करण्यासाठी आलेल्या घरातील युवकास मारहाण केली या मारहाणीत युवकास किरकोळ दुखापत झाली आहे त्यांनतर चोरटे गावच्या पुर्व दिशेला पळून गेले घटनेचे वृत्त समजताच गावातील १००ते१५०युवक घटनास्थळी दाखल झाले व चोरांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला परंतु तत्पूर्वी चोरटे पसार झाले होते .

### माजी आ.बाळासाहेब

वेळी रोजा सोडण्याच्या प्रक्रियेला 'इफ्तार' असे म्हटले जाते. या इफ्तारच्या निमित्ताने विविध धर्म व समाजातील नागरिक एकत्र येऊन स्नेहभोजन करतात. त्यामुळे समाजात बंधुभाव, सलोखा आणि एकोपा वाढीस लागतो. या प्रसंगी आष्टी शहरासह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, डॉक्टर वकील समाजसेवक, व्यापारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विकास साळवे यांना रुग्णसेवक

अनिल निबोरे, संगीता पोकळे, सुमित्रा गायकवाड, शितल उदावत, वर्षा ससाने, शैला करांडे, रत्नमाला चाळक मंगल साळवे, नंदकिशोर करांडे, सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे, बबनराव करांडे, श्रीहरी पुरी महाराज,जालीधर नरवडे, बाबासाहेब नरवडे, उत्तम देवकर, बाळासाहेब काका करांडे,दिपक उंबरकर.विनोद रोडे नाना,दता हुले सोमनाथ तोडकर , सोमनाथ कोल्हे,विजय डुकरे, संतोष नरवडे,ललेश नरवडे, गोकुळ नरवडे, महादेव चव्हाण कृष्णा पाणतावणे, दिपक कासवा, रितेश पाणतावणे आदि उपस्थित आपल्या पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### शिरूर कासार तालुक्यात

शेतात राहून पिकांची राखण करतात, मात्र त्यावेळी जंगली प्राण्यांकडून हल्ला होण्याची भीतीही सतावत आहे.

सध्या राज्यात अधिवेशन सुरू असल्याने लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न शासनाच्या पातळीवर ठामपणे मांडावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. शेतजमिनीभोवती भक्कम कंपाऊंड किंवा अन्य संरक्षण व्यवस्था उभारली गेल्यास पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात टाळता येईल, असे मतही शेतकरी मांडत आहेत. दरम्यान, शिवसेना जिल्हा संघटक तसेच देवसेना जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनीही या प्रश्नावर आवाज उठवला आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवून त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी त्यांनी केली आहे. लोकप्रतिनिधींनी याकडे दुर्लक्ष केले तरी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

### तणावपूर्ण जीवनात अध्यात्माची

भक्ती या मूल्यांवर आपण चाललो तर समाजातील राग, मत्सर आणि वाद आपोआप नाहीसे होतील. परिणामी समाजात शांतता, प्रेम आणि आपुलकी वाढेल. अशा वातावरणात जीवन अधिक आनंदमय होईल आणि प्रत्येकाला खऱ्या अर्थाने 'विठ्ठल सुख' अनुभवता येईल.''

सप्ताहाच्या सांगता प्रसंगी कीर्तन, हरिपाठ आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास गावातील नागरिक, महिला-पुरुष, वारकरी तसेच युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## वल्लभ मोगरेकरची पुणे येथील स्पर्धेत शानदार कामगिरी



माजलगाव: साडेपाच वर्षीय प्रतिभावंत खेळाडू वल्लभ कुलकर्णी मोगरेकर याने उत्कृष्ट कामगिरी करून आपली प्रतिभा पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. दिनांक १५ मार्च रोजी महिला दिन निमित्त खुल्या आणि वयोगट रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन सिहगड लॉ कॉलेज मध्ये करण्यात आले होते वयोगट ८ वर्षाखालील गटामध्ये वल्लभ ने सहभाग नोंदवला होता पुण्यातील अतिशय तयारी करून आलेल्या स्पर्धकां सोबत वल्लभ चा विविध फेऱ्या मध्ये सामना होणार होता त्याच्या वयोगटात अनेक स्पर्धकानी सहभाग नोंदवला होता. सुरुवातीचे तिन्ही राऊंड जिंकून निर्विवाद आघाडी घेतली होती.चौथ्या सामन्यातील एक छोट्या चुकीमुळे त्याला सामना गमावला लागला मात्र अंतिम सामन्यात आरव बोरा या चांगल्या खेळाडू सोबत त्याने बरोबरी साधून या स्पर्धेत त्याने तृतीय क्रमांक मिळवून कॅश प्राईझ सोबत ट्रॉफी जिंकली.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि.१७ मार्च २०२६



# नाल्याच्या गॅसवर 'चाय पे चर्चा'!

## सरकारच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन

बीड। प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या धोरणांमुळे गॅस टंचाई निर्माण झाली असून गॅस दरवाढ आणि व्यावसायिक गॅसवरील निर्बंधांमुळे खाणावळी बंद पडण्याच्या स्थितीत आल्या आहेत. तसेच घरगुती गॅस सिलेंडरसाठी ऑनलाईन बुकिंग बंद असल्याने ग्राहकांना रांगेत तासनतास उभे राहावे लागत असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले. जिल्हा प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान समाधान शिबिर प्रमाणेच "मोदी टेक्नॉलॉजीचा प्रचार, प्रसार करून नाल्यातून निघणाऱ्या गॅसवर चहा बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. "नाल्याच्या गॅसवरील चाय पे चर्चा" या लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे केंद्र सरकार व जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. सरकार आणि जिल्हा प्रशासन गॅस टंचाई नसल्याचे सांगून ग्राहकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यावेळी "मोदी टेक्नॉलॉजी वापरा, गॅस टंचाई दूर करा" तसेच "जिल्हा प्रशासनाचा मोदींवर भरोसा नाही का?" अशा घोषणाबाजी करण्यात आली. या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, मुबीन शेख, सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), गणेश धोंडरे (शिवसंग्राम नेते), राजेंद्र आमटे शेतकरीपुत्र हक्क आंदोलक), प्राचार्य डी.जी.तांदळे ( मार्गदर्शक मराठवाडा शिक्षक संघ), किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष विश्वकल्याण सेवाभावी संस्था बीड)आदी सहभागी झाले. जिल्हा प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान समाधान शिबिर प्रमाणेच "मोदी टेक्नॉलॉजीचा अभियानाद्वारे प्रचार प्रसार करून गॅस टंचाई दूर करावी. जिल्हा प्रशासनाने गॅसच्या सुरळीत वितरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असुन पोलिस अधीक्षक सचिव आहेत.या समितीकडे नियंत्रण, सुरळीत पुरवठ्याची जबाबदारी दिली असुन साठेबाजी करणा-यांवर जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्याऐवजी जिल्हा प्रशासनाने मोदी टेक्नॉलॉजी द्वारे गॅस टंचाई दूर करावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान समाधान शिबिर प्रमाणे जिल्हाभरात अभियान राबवत गस टंचाई ग्राहकांचे समाधान करावे अशी उपरोधिक टीका डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.




गॅस टंचाई दूर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात "मोदी टेक्नॉलॉजी वापरा आणि गॅस टंचाई दूर करा" या घोषणेसह

## नगरपालिकेत जसे चार प्रतिनिधी निवडून आणले तसेच जिल्हा परिषदेतही पाठवणार-पोटभरे

### बहुजन विकास मोर्चाचा संवाद मेळावा उत्साहात



माजलगाव । प्रतिनिधी

बहुजन समाजाच्या हक्कांसाठी एकजूट होऊन लढा देण्याची गरज असून नगरपालिकेत जसे चार प्रतिनिधी निवडून आले तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही बहुजन विकास मोर्चाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी ग्रामीण भागातील तरुणांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे नेते बाबुराव पोटभरे यांनी केले. दि. १५ रोजी माजलगाव येथे आयोजित बहुजन विकास मोर्चाच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते. कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे (नाना) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास बहुजन समाजातील नागरिक व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बाबुराव पोटभरे म्हणाले की, हा कार्यक्रम केवळ भोजनाचा नसून बहुजन समाजाच्या विचारांचा आणि संघटन बांधणीचा आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने वर्षातील ३६४ दिवस भारतीय संविधानाचे वाचन करावे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहाने व नाचून साजरी करावी. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी संविधानाचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, सुरुवातीला अनेक प्रस्थापित विरोधकांना असे वाटत होते की बहुजन विकास मोर्चाचा एकही उमेदवार नगरपालिकेत निवडून येणार नाही. मात्र जनतेच्या विश्वासामुळे चार प्रतिनिधी विजयी झाले. हे चार वाघ नगरपालिकेत पोहोचले तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही बहुजन विकास मोर्चाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. यावेळी बहुजन विकास मोर्चाच्या वतीने नवनिर्वाचित पाच नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये वडवणीचे नगरसेवक बाबा वाघमारे तसेच माजलगावचे नगरसेवक अभिजीत (भैय्या) पोटभरे, सचिन जावळे, अशोक लांडगे आणि सदानंद (भैय्या) प्रधान यांचा सन्मान करण्यात आला. मेळाव्यात बहुजन समाजातील संघटन बळकट करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बहुजन विकास मोर्चाच्या वतीने आयोजित या संवाद मेळाव्यात माजलगावचे माजी उपनगराध्यक्ष कचरू तात्या खळगे यांनी बाबुराव पोटभरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत बहुजन विकास मोर्चामध्ये प्रवेश केला. तसेच पत्रकार राजरतन डोंगरे यांच्यासह किरण डोंगरे, सत्यपाल खळगे, आतिश जाधव, संजय डोंगरे आदींसह हजारो कार्यकर्त्यांनी बहुजन विकास मोर्चामध्ये प्रवेश करून संघटनेला पाठिंबा जाहीर केला. तसेच दि. २३ मार्च २०२६ रोजी श्रद्धेय ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आरएसएस मुख्यालयावर काढण्यात येणाऱ्या मोर्चाला बहुजन विकास मोर्चाच्या वतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल पंडित यांनी केले, तर सूत्रसंचालन पत्रकार राजरतन डोंगरे व नवनाथ धाईजे यांनी केले. प्रसंगी विठ्ठल पंडित, विठ्ठल जाधव, सचिन डोंगरे, शेख बाबा, संभाजी शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मेळाव्यात विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून बहुजन समाजाच्या एकजुटीची गरज अधोरेखित केली.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत 'डिजिटल शिक्षण प्रणाली'चा दिमाखदार शुभारंभ!

पाटोदा । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करण्यासाठी, येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, पाटोदा येथे 'डिजिटल शिक्षण' प्रणालीचा शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. "शिक्षण हे पणतीने पणती पेटवण्यासारखे आहे" हा उदात्त विचार डोळ्यासमोर ठेवून शाळेने हे प्रगत पाऊल उचलले आहे.मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. सतीश दादा गर्जे, (पत्रकार), मा. श्री. जितेंद्र भोसले (पत्रकार) यांची विशेष



उपस्थिती होती. तसेच मा. श्री.जाधव एल. आर.सर (सेवानिवृत्त मुख्याध्यापक ), मा. श्री. दादासाहेब घुमरे सर (मु. अ.) आणि मा. श्री. प्रशांत देशमुख ,श्री श्रीकांत लांडगे,,यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.डिजिटल शिक्षणाचे महत्त्व कार्यक्रमादरम्यान बोलताना मान्यवरांनी सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही जागतिक दर्जाचे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. डिजिटल शिक्षणामुळे अवघड विषय सोप्या पद्धतीने समजून घेण्यास मदत होईल आणि विद्यार्थ्यांची अभ्यासातील गोडी वाढेल. फळ्यावरील पारंपरिक शिक्षणासोबत आता तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने शाळेच्या गुणवत्तेत अधिक भर पडणार आहे. शाळेचे कौतुक शाळेच्या या उपक्रमाचे पालकांनी आणि ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले आहे. मोजक्या संसाधनांतून गुणवत्तेचा दर्जा उंचावण्यासाठी शाळेने केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व मु.अ. मोरे सर व शिक्षक कर्मचारी श्रीमती वीर मॅडम, श्रीमती.शेलार मॅडम श्री.माताडे सर या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ॲट्रॉसिटी कायद्याबाबतच्या निर्णयाचा निषेध; पाटोद्यात सर्वपक्षीय एल्गार

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य समाज कल्याण राज्यमंत्री संजय शिरसाट यांनी ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्याबाबत आणि अटकेच्या प्रक्रियेबाबत घेतलेल्या कथित निर्णयाचा सर्वपक्षीय पाटोदा तालुक्याच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दलितांवरील अन्यायाला वाचा फोडणारा कायदा कमकुवत होत असल्याची भावना व्यक्त करत, सर्व पक्ष वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. काय आहे प्रकरण? काही दिवसांपूर्वी राज्यमंत्री संजय शिरसाट यांनी ॲट्रॉसिटी कायद्याबाबत एक विधान केले होते, ज्यानुसार तपासी अधिकाऱ्याला गुन्हा दाखल करण्यापूर्वी किंवा अटक करण्यापूर्वी काही मर्यादा येणार असल्याचे संकेत मिळाले होते. या निर्णयामुळे समाजात चुकीचा संदेश जात असून, गुन्हेगारांचे मनोबल वाढण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

आंदोलकांचा पवित्रा पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर संविधान प्रेमी कार्यकर्त्यांनी धडक दिली. यावेळी राज्यमंत्र्यांच्या निर्णयाचा




निषेध करण्यात आला. निवेदनात प्रामुख्याने खालील मागण्या करण्यात आल्या आहेत: ॲट्रॉसिटी कायद्याचा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा. हा कायदा अधिक कडक करून त्यात कोणत्याही पळवाटा ठेवू नयेत. दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात प्रशासनाने अधिक तत्परतेने काम करावे.

प्रशासनाला इशारा यावेळी बोलताना आरपीआयचे व तालुका पदाधिकारी म्हणाले की, "राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय अन्यायकारक असून तो घटनादत्त अधिकारांवर गदा आणणारा आहे. जर हा निर्णय मागे घेतला नाही, तर आगामी काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल." या निवेदनाच्या प्रती तहसील कार्यालय पाटोदा आणि पोलीस स्टेशन पाटोदा यांनाही माहितीसाठी देण्यात आल्या आहेत. या आंदोलनात आरपीआय पक्षाचे नेते डॉक्टर नरेंद्र जावळे पाटोदा नगरपंचायत सभापती किशोर अडागळे बहुजन विकास मोर्चाचे तालुकाध्यक्ष गोरख रावजी झेंड ॲड. जब्बार भाई पठाण अरविंद सरवदे नाईकवाडे मामा आनंद जावळे अतुल देवडे लहुजी शक्ती सेनेचे तालुकाध्यक्ष गणेशजी रणदिवे विजय आडागळे निखिल आडगळे दिनेश नारायणकर सतीश गर्जे पत्रकार आधी जण उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/७०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १६/०३/२०२६

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : ध्रुपतीबाई विठ्ठल वाघमारे २. सुदाम विठ्ठल वाघमारे ३.लताबाई उद्धव शिंदे सर्व्हे नं.-४ मधील प्लॉट नं. २६व २७ चे हस्तांतर करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- वाघमारे यांचे घर
पश्चिम : कुलकर्णी यांचे घर
दक्षिण- सरकारी रस्ता
उत्तरः मोहकर यांचे घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

**महाराष्ट्र शासन**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय शिरूर का, जि. बीड**
**दुरध्वनी क्रमांक - ०२४४४-२५९३५९**
Email.tahsildarshirurkasar@gmail.com
**क्र.२०२६/विलंब जन्म नोंद/प्र.क्र.६९/२०२६/कावि- २३४**
**दि. ०९/०३/२०२६**
**विलंब जन्म नोंद जाहीर प्रगटन**

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९, (सुधारीत २०२३) च्या कलम १३ (३) अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेणे बाबत

ज्या अर्थी अर्जदार विशाल कैलास इंगळे, रा. पाडळी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी स्वतःचा जन्म दिनांक ०१/०६/१९९८ रोजी पाडळी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून नियमानूसार अर्जाची सुनावणी घेउन विलंबाने जन्म नोंद घेणे बाबत आदेश केला जाईल.

**स्वाक्षरीत/**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी शिरूर कासार**

## सरकारी पगार वेळेवर, पण काम मात्र मनावर

### नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांचा घरूनच कारभार, कार्यालय सोडले वाऱ्यावर नागरिकांची कामे रखडली

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेमधील प्रशासनाचा कारभार सध्या पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे चित्र समोर येत असून काही अधिकारी-कर्मचारी कार्यालयात नियमित उपस्थित राहण्याऐवजी स्वतःच्या घरूनच नगरपरिषदेचा कारभार चालवत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यामुळे नगरपरिषद कार्यालय अक्षरशः वाऱ्यावर सोडल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशानुसार सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठरलेल्या वेळेत उपस्थित राहून नियमित कामकाज करणे बंधनकारक असताना बीड नगरपरिषदेत मात्र याच्या पूर्णपणे विरोधी परिस्थिती दिसून येत आहे. प्रत्यक्षात नगरपरिषद कार्यालय सकाळी उशिरा सुरू होत असून अनेक कर्मचारी दुपारी लवकरच कार्यालयातून निघून जात असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येत आहे.

या मनमानी कारभारामुळे विविध कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असून अनेकांची कामे दिवसन्?दिवस प्रलंबित राहत आहेत. काही कर्मचारी वारंवार कार्यालयाबाहेर जात असल्यामुळे नागरिकांना संबंधित अधिकाऱ्यांची वाट पाहत बसावे लागत असल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे.

शासनाच्या नियमांनुसार कार्यालयात बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली व हालचाल नोंदवही ( ) असणे आवश्यक असताना बीड नगरपरिषदेमध्ये या बाबीकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी कर्मचारी मनमानी वेळेत येणे-जाणे करत असल्याने कार्यालयीन शिस्त पूर्णपणे ढासळल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे स्वतः वेळेचे काटेकोर पालन करत प्रशासनात शिस्त राखण्याचा प्रयत्न करत असताना त्यांच्या अधिनस्त असलेल्या नगरपरिषदेमध्ये मात्र प्रशासनाचा कारभार नियोजनशून्य पद्धतीने सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी, बीड जिल्हा (पश्चिम) यांच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देऊन नगरपरिषद कार्यालयास अचानक भेट देऊन प्रत्यक्ष तपासणी करावी व कार्यालयीन वेळेत अनुपस्थित आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नगरपरिषदेमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली तात्काळ सुरू करणे, हालचाल नोंदवही ठेवणे व कार्यालयीन शिस्त काटेकोरपणे लागू करणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय**
**(दंड -विभाग) ता. आष्टी जि.बीड**
EMAIL ID-TAHSILDARASHTI@GMAIL.COM
**दूरध्वनी. क्र.- (०२४४१) २८२५४२**
**क्र.२०२५/दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-१६५**
**दि. १६/०३/२०२६**
**जाहीरनामा**
**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे वाघळूज ता. आष्टी.जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे, श्रीमती. लतिका पांडुरंग हत्ते रा.पुणे यांनी त्यांचे पती नामे, पांडुरंग महादू हत्ते मृत्यू दि.०५/०६/२०२१ रोजी मौजे. वाघळूज ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म/मृत्यू ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. करीता सदरहू अर्जदाराचे यांची पती यांचे कायदेशीर मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६/०३/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत/
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,आष्टी**

**महाराष्ट्र शासन**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय शिरूर का, जि. बीड**
**दुरध्वनी क्रमांक - ०२४४४-२५९३५९**
Email.tahsildarshirurkasar@gmail.com
**क्र. २०२६/ विलंब जन्म नोंद/प्र.क्र.७०/२०२६/कावि-२३५**
**दि. ०९/०३/२०२६**
**विलंब जन्म नोंद जाहीर प्रगटन**

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९, (सुधारीत २०२३) च्या कलम १३ (३) अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेणे बाबत

ज्या अर्थी अर्जदार वैभव कैलास इंगळे, रा. पाडळी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी स्वतःचा जन्म दिनांक ११/११/१९९९ रोजी पाडळी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून नियमानूसार अर्जाची सुनावणी घेउन विलंबाने जन्म नोंद घेणे बाबत आदेश केला जाईल.


**स्वाक्षरीत/**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी शिरूर कासार**

# महाराष्ट्र-कॅनडा दरम्यान कृषी तंत्रज्ञान, एआय व अन्नप्रक्रिया क्षेत्रातील सहकार्याला गती देणार

## कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर भर ; कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

पुणे / प्रतिनिधी

महाराष्ट्रात कृषी क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर राज्य सरकार भर देत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, कृषी शिक्षण, कृषी अन्नप्रक्रिया उद्योग आणि तंत्रज्ञानाधारित स्टार्टअप्सच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि कॅनडा यांच्यातील सहकार्य अधिक बळकट झाल्यास कृषी व कृषी तंत्रज्ञान क्षेत्रात गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण होतील,'' असा विश्वास कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला.



कॅनडातील उद्योग व संशोधन क्षेत्रातील प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेतली. या बैठकीत महाराष्ट्र आणि कॅनडा यांच्यात कृषी, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच ग्रामीण विकास क्षेत्रातील संभाव्य सहकार्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. कृषी तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्य विकास तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी विविध क्षेत्रांतील सहकार्याच्या संधींचा प्राथमिक आढावा यावेळी घेण्यात आला. या बैठकीस कृषी विभागाचे सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, उपसचिव श्रीकांत हांडगे, अवर सचिव ललितकुमार धायगुडे तसेच पोखरा प्रकल्पाचे संचालक परिमल सिंह उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र शिक्षण व संशोधन परिषदचे सदस्य विनायक काशीद, इंडो कॅनडा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रशांत श्रीवास्तव, उपाध्यक्ष अलोक नागपाल, संदीप मामजीन, करम वीर राठी, विकास गुप्ता कॅनडातील उद्योग व संशोधन क्षेत्रातील इतर प्रतिनिधी ही उपस्थित होते.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, हवामान हा शेती क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा घटक असून पर्जन्यमान, तापमान, वाऱ्याचा वेग तसेच आर्द्रता या घटकांवर पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालींच्या वापरामुळे हवामानाचा अधिक अचूक अंदाज घेणे तसेच उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून शेतकऱ्यांना योग्य वेळी मार्गदर्शन करणे शक्य होत आहे. बैठकीत कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ताच्या वापरामुळे शेती अधिक वैज्ञानिक, अचूक आणि नफ्याची बनत असल्याचे सांगण्यात आले. हवामान बदल, पाण्याची कमतरता तसेच बाजारातील अनिश्चितता यांसारख्या आव्हानांवर मात करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण सहाय्य ठरत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. महाराष्ट्र आणि कॅनडा यांच्यात कृषी तंत्रज्ञान, संशोधन व गुंतवणूक या क्षेत्रांत सहकार्य वाढविण्याबाबत सकारात्मक माहिती देण्यात आली. याशिवाय शिक्षण व कौशल्य विकास, कृषी तंत्रज्ञान संशोधन, अन्नप्रक्रिया उद्योग, कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, पुरवठा साखळी व्यवस्थापन तसेच शाश्वत कृषी पद्धती यांसंदर्भात तांत्रिक व ज्ञानाधारित सहकार्याच्या शक्यतांवरही चर्चा करण्यात आली. यावेळी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे आणि कॅनडातील विद्यापीठांदरम्यान संशोधन सहकार्य वाढविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दोन्ही देशांतील विद्यापीठांमध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प, तंत्रज्ञान देवाणघेवाण तसेच विद्यार्थ्यांसाठी आंतरविद्यापीठ स्तरावर दुहेरी पदवी कार्यक्रम आणि विविध शिष्यवृत्ती योजनांच्या माध्यमातून शैक्षणिक सहकार्य वाढविण्याच्या संधीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण, संशोधन अनुभव आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळू शकते. तसेच तंत्रज्ञानाधारित स्टार्टअप, नवकल्पना परिसंस्था आणि कृषी संशोधन सहकार्याला चालना देण्यासाठी संभाव्य सहकार्याच्या संधींचाही आढावा यावेळी घेण्यात आला. अन्नपोषण, सार्वजनिक आरोग्य तसेच ग्रामीण विकासाशी संबंधित विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात भविष्यात सहकार्य करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला. या चर्चेच्या माध्यमातून कृषी, तंत्रज्ञान, संशोधन आणि ग्रामीण विकास क्षेत्रात महाराष्ट्र आणि कॅनडा यांच्यातील सहकार्याला भविष्यात नवी दिशा मिळेल, असा विश्वास कृषीमंत्री भरणे यांनी व्यक्त केला.

# चियाच्या दरात घसरण सुरूच

## पंधरा दिवसांत प्रतिक्विंटल साडेतेराशे रुपयांची घसरण




पुणे : नावीन्यपूर्ण पीक म्हणून ओळख मिळवत असलेल्या चियाच्या दरातील घसरण कायम आहे. गेल्या पंधरा दिवसात चियाच्या दरात क्विंटलमागे १ हजार ३५० रुपयांची घसरण झाली आहे. बाजार समित्यांमध्ये या शेतमालास १५ हजार २५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. त्यामुळे चिया उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

विदर्भासह राज्याच्या इतर ठिकाणीही प्रामुख्याने हळद आणि चियाच्या दरात सतत घसरण होत आहे. मागील काही दिवसांपूर्वी तेजीत असलेल्या हळदीचे दर घसरले असतानाच चियाच्या दरातही घसरण सुरू झाली आहे. फेब्रुवारीत चियाचे दर थेट १६ हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत आले. आता मात्र चियाच्या दरात घसरण होत असल्याचे दिसत आहे. शनिवार, ७ मार्चला बाजार समितीत चियाला कमाल १५ हजार ७०० रुपये प्रतिक्विंटल, तर शनिवार ७ मार्चला चियाला किमान १३ हजार ३०० ते कमाल १५ हजार ६०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत दर मिळाला. आठवडाभरातच चियाच्या दरात आणखी ३५० रुपयांची घसरण होऊन चियाचे दर १५ हजार २५० रुपये प्रतिक्विंटलवरच आले.

# भदावरी म्हशीच्या दुधात १४ ते १८ टक्के फॅट; वाचा किती देते दूध?

राज्यासह देशामध्ये ग्रामीण भागात दूध व्यवसायामुळे शेतकऱ्यांची चांगली भरभराट झाली आहे. शेतकरी प्रामुख्याने त्या-त्या भागात, संबंधित वातावरणानुसार म्हशींच्या जातींचे पालन करताना दिसतात. देशात म्हशींच्या अनेक जाती आहेत. त्यातीलच एक जात म्हणजे भदावरी म्हैस होय. या म्हशीची विशेषतः म्हणजे तिच्या दुधामध्ये मोठ्या प्रमाणात फॅट असते. ज्यामुळे अधिकचा दर मिळवण्यासाठी शेतकऱ्यांकडून या जातीच्या म्हशीला विशेष मागणी असते. या जातीच्या म्हशीच्या दुधामध्ये जवळपास १४ ते १८ टक्क्यांपर्यंत फॅट असते. ज्यामुळे ती इतर जातींपेक्षा वेगळी ठरते.



भदावरी म्हशीचे मूळस्थान : भदावरी जातीची म्हैस ही प्रामुख्याने आग्रा, इटावा, मुरैना, ग्वालियर या उत्तर-मध्य भारतातील जिल्ह्यांमध्ये आढळते. या सर्व जिल्ह्यांच्या भागाला पूर्वी 'भदावर' नावाने ओळखले जात होते. ज्यामुळे या म्हशीचे नाव 'भदावरी म्हैस' असे पडले. या प्रजातीची म्हैस ही प्रामुख्याने लालसर तपकिरी रंगाची असते. तर तिचा बांधा हा मध्यम आकाराचा असतो. पुढील बाजूने ही म्हैस बारीक तर मागील बाजूने काहीशी फुगीर असते. या म्हशीची शिंगे ही सपाट, जाड व मागे तसेच आतील बाजूस वळलेली असतात. या प्रजातीच्या रेड्याचे वजन हे ४०० ते ५०० किलो तर म्हशीचे वजन हे ३५० ते ४०० किलो इतके असते.

किती दूध देते? : भदावरी जातीची म्हैस ही दररोज ६ ते ८ लिटर दूध देण्यास सक्षम आहे. भदावरी म्हैस ही मुऱ्हा म्हशीपेक्षा कमी दूध देते. मात्र, ती तूप निर्मितीसाठी सरस ठरते. विशेष म्हणजे जगातील कोणत्याही म्हशीच्या दुधात इतक्या मोठ्या प्रमाणात फॅट नसते. या म्हशीच्या दुधामध्ये सर्वाधिक १४ ते १८ टक्के फॅट आढळते. तसेच ही म्हैस आपल्या एकूण प्रजननकाळात सरासरी १३००-१५०० लिटर दूध देण्यास सक्षम मानली जाते.

किती आहे किंमत? : भदावरी म्हशीच्या दुधामध्ये मोठ्या प्रमाणात फॅट असल्याने, आता अनेक शेतकऱ्यांच्या मनात ही म्हैस खरेदी करण्याचा विचार मनात आला असेल. तसेच या म्हशीची किंमत किती असेल. हा विचार देखील शेतकऱ्यांचा मनात आला असेल. तर ही म्हैस प्रामुख्याने शेतकऱ्यांना ६० ते ७० हजारांपर्यंत मिळू शकते. शेतकऱ्यांनी शक्यतो कोणत्याही ऑनलाईन प्रलोभनांना बळी न पडता, सुरक्षित मार्गाने जनावरांची खरेदी करावी.

ही आहेत 'या' म्हशीची वैशिष्ट्ये : भदावरी प्रजातीच्या म्हशीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही म्हैस कोणत्याही प्रकारच्या वातावरणात जुळवून घेते. ज्यामुळे देशातील प्रत्येक राज्यामध्ये ही म्हैस पाळणे सहजशक्य आहे. दूध उत्पादकांना म्हशीच्या दुधाला अधिक फॅट मिळवून, दुग्ध व्यवसायात आर्थिक भरभराट करून घ्यायची असेल. तर त्यांच्यासाठी ही म्हैस उत्तम पर्याय ठरणार आहे. या प्रजातीच्या म्हशीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिला तुलनेने कमी चारा लागतो. असे असूनही ती गुणवत्तापूर्ण दूध देण्यास महत्वपूर्ण ठरते. त्यामुळे या म्हशीच्या चाऱ्यावर शेतकऱ्यांचा खर्च कमी होतो. याशिवाय या प्रजातीच्या म्हशीची रोगप्रतिकारशक्ती उत्तम असते. तसेच ती अत्यंत कठीण परिस्थितीतही तग धरून राहते.

# बीड येथील कृषी प्रदर्शनात येणार शेतकऱ्यांनी पिकवलेले धान्य विक्रीसाठी!

## शेतमजुरीला पर्याय ठरणारे अवजारे दालन ठरणार आकर्षण

बीड (प्रतिनिधी )

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या वर्षी प्रथमच बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडागणा मध्ये दिनांक ०३ ते ०६ एप्रिल दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शन असे चार दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू असून यंदा कृषी प्रदर्शनामध्ये २०० अधिक स्टॉलचा सहभाग असणार आहे. यात विशेष आकर्षण ठरणार आहे ते म्हणजे शेतमजुरीला पर्याय ठरणारे अवजारांचे दालन. विविध लागणारे निळ्या खुरप्यापासून तो ऊस तोडणी यंत्रापर्यंत सर्व प्रकारच्या मजुरीला पर्याय ठरणाऱ्या अवजाराचे दालन विशेष आकर्षण ठरणार आहे. शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये उत्पादित केलेला माल थेट स्वतः शेतकरी या प्रदर्शनात धान्य महोत्सवाच्या माध्यमातून विक्री करण्यासाठी ठेवणार आहेत. या अनुषंगाने प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू असून या प्रदर्शनाचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोलीसह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहाने गेवराई पाठोपाठ बीड येथे या प्रदर्शनाचे आयोजन प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना, ऑल इंडिया डीलर ॲग्रो इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे. एकदिवसीय

### शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

शासनाच्या मदतीविना हे प्रदर्शन होत असून, गेल्या १८ वर्षापासून शासनाच्या कोणत्याही अनुदानाशिवाय ही संस्था हे प्रदर्शन सातत्याने आयोजित करते. यावेळी प्रथमच जिल्ह्यातील उत्कृष्ट दर्जाचा उत्पादित केलेला धान्य माल थेट ग्राहकांच्या च्या दारात मिळावा या उद्देशाने शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या संस्थांना अल्प दरात स्टॉल दिला जाणार आहे. स्टॉल बुकिंगसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. ९८८१०४५३१५, ९४२२२९४३३८, ८६००४७४६०६

पशुप्रदर्शन, डॉग शो तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहेत. विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रदर्शनात विविध कार्यक्रमाचे रिसेल चालणार असून ४ दिवसांमध्ये या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२७ : खांडवा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी चित्तौडगढचे शासक राणा संग्राम यांचा पराभव केला.
१७८२ : इस्ट इंडिया कंपनी आणि मराठा शासक यांच्यात सालाबाईचा तह झाला.
१८४५ : ब्रिटीश शोधक आणि उद्योगपती स्टीफन पेरी यांनी रबर बँडसाठी पेटंट प्राप्त झाले होते.
१९५७ : व्हॅनगार्ड-१ या अमेरिकेच्या पहिल्या सौरउर्जाचलित उपग्रहाचे प्रक्षेपण झाले.
१९४४ : भारतीय नौदल अभियांत्रिकी संस्था आय. एन. एस. शिवाजीची लोणावळा येथे स्थापना.
१९५८ : 'व्हॅनगार्ड-१' या अमेरिकेच्या पहिल्या, एकूण चौथ्या आणि पहिल्या सौरऊर्जाचलित उपग्रहाचे प्रक्षेपण
१९६९ : गोल्डा मायर या इस्त्रायलच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री बनल्या.
१९८७ : भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी क्रिकेट खेळापासून सन्यास घेतला.
१९९७ : मुंबईत वातानुकुलित टॅक्सी सेवेचा शुभारंभ

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : भारतीय अभियंता जोसेफ बाप्टीस्ता यांचा जन्म.
१९०९ : रामचंद्र नारायण दांडेकर भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक (मृत्यू: ११ डिसेंबर २००१)
१९२० : बांगला देशाचे राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबर रहमान.
१९२७ : 'विश्वास' स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुत्र (मृत्यू:)
१९४६ : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा जन्मदिन.
१९६२ : भारतीय अमेरिकी अंतरीक्ष यात्री कल्पना चावला यांचा जन्मदिन.
१९७५ : भारतीय अभिनेता, गायक पुनीथ राजकुमार यांचा जन्म.
१९७९ : शर्मन जोशी अभिनेता
१९९० : भारतीय बॅडमिंटनपटू साइना नेहवाल यांचा जन्मदिवस.
१९१२ : मिस्टर युनिव्हर्सचे जेतेपद पटकाविणारे पहिले भारतीय बॉडीबिल्डर मनोहर आयच यांचा जन्मदिवस.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२१० : आदिनाथ संप्रदायाचे प्रवर्तक मत्स्येन्द्रनाथ (मच्छिंद्रनाथ) यांनी सातारा जिल्ह्यात मत्स्येन्द्रगड येथे समाधी घेतली. चैत्र व. ५ (जन्म:)
१७८२ : डॅनियल बर्नोली डच गणितज्ञ (जन्म: ८ फेब्रुवारी १७००)
१८८२ : विष्णूशास्त्री चिपळूणकर आधुनिक मराठी गद्याचे जनक, ग्रंथकार आणि 'केसरी'चे एक संस्थापक. चित्रशाळा, आर्यभूषण छापखाना, किताबघर यांसारखे अनेक समाजोपयोगी उपक्रम त्यांनी सुरू केले. (जन्म: २० मे १८५०)
१९१० : अनुताई वाघ समाजसेविका (जन्म: २७ सप्टेंबर १९९२)
१९३७ : 'चंद्रशेखर' शिवराम गोर्हे बडोद्याचे राजकवी, 'गोदागौरव' आणि 'कविता रति' ही त्यांची विशेष गाललेली काव्ये आहेत. (जन्म: २६ जानेवारी १८९१)
१९५६ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ सप्टेंबर १८९७)
१९५७ : रॅमन मॅगसेसे फिलिपाइन्सचे ७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३१ ऑगस्ट १९०७)
१९७७ : भारतीय शास्त्रीय संगीत गायिका सिद्धेश्वर देवी यांचे निधन.
२००० : 'राजकुमारी' दुबे पार्श्वगायिका व अभिनेत्री (जन्म:)
२०१६ : इंग्लंड देशातील इंग्रज जादुगार पॉल डॅनियल्स यांचे निधन.

# ४० डिग्री तापमान सहन करणारी 'सिरोही शेळी'



दूध आणि मांस उत्पादन या दोन्ही उद्देशासाठी वापरली जाणारी सिरोही शेळीत फारच वेगळे गुणधर्म आहे. सिरोही शेळी धिटपणा आणि रोग प्रतिकार शक्तीसाठी ओळखल्या जातात. ज्यामुळे त्यांची देखभाल तुलनेने कमी आणि काळजी घेणे सोपे होते.

उगम : ही शेळी मुळची राजस्थान मधील सिरोही जिल्ह्यातली आहे. प्रामुख्याने राजस्थानमधील अरवली पर्वतरांगेच्या आसपासच्या भागात आढळते. याशिवाय गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि हरियाणा या राज्यांमध्ये सुद्धा या शेळ्या आढळतात. तसेच कर्नाटक आणि केरळ राज्यातही सिरोही जातीच्या शेळीचे पालन केले जाते.

शारीरिक ठेवण : या शेळ्यांच्या शरीरावर तपकिरी, काळे आणि पांढरे रंगाचे ठिपके असतात. तर, काही ठिकाणी या शेळ्या पूर्णपणे एकाच रंगात आढळतात. ही शेळी मध्यम व दंड गोलाकार आकाराची असते. अंगावर एकदम दाट केस असतात. शेळीचे कान मध्यम आकाराचे आणि तळाशी पानांच्या आकाराचे असतात. या शेळीचे शिंगे भक्कम असतात व ती मागच्या बाजूला वळलेली असतात. मादीचे वजन हे ४५ ते ५० किलोपर्यंत असते तर बोकडाचे वजन अंदाजे ६० ते ६५ किलो असते.

प्रजनन आणि दूध उत्पादन : सिरोही शेळी १.५ वर्षात दोन वेळा वेत देते. शेळ्यांमध्ये १ पिल्लू देण्याचे प्रमाण ४०%, २ पिल्लू देण्याचे प्रमाण ५०%, ३ पिल्लू देण्याचे प्रमाण १०% आहे. या शेळ्या १४ ते १६ महिन्यांत करडांना जन्म देऊ लागतात. संपूर्ण आयुष्यात १०-१२ करडू देण्याची क्षमता सिरोही शेळीमध्ये असते. या शेळीची प्रतिदिन दूध देण्याची क्षमता ०.५ ते १.५ लिटर इतकी असते.इतर वैशिष्ट्ये : सिरोही शेळी जास्तीत जास्त ४०+ उष्ण वातावरण तसेच कमीत कमी ४ ते ५ डिग्री पर्यंत थंडी सहन करू शकते. बोकडांच्या शारीरिक रचनेमुळे व त्यांच्या रंगामधील विविधतेमुळे सिरोही बोकडांना ईद मध्ये मोठ्या प्रमाणात मागणी असते. या शेळ्यांना दिवसातून पाच ते सहा किलो चारा लागतो तर यामध्ये ७० टक्के हा हिरवा चारा तर ३० टक्के सुका चारा दिला जातो.

# तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्रींनी स्वत:वरच केले वार

## प्रकृती स्थिर परंतु वारकरी संप्रदायाला मोठा धक्का !

पाथर्डी। प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील अत्यंत पवित्र आणि वारकरी संप्रदायाचे प्रमुख श्रद्धास्थान असलेल्या तारकेश्वर गडाशी संबंधित एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली असून यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांमध्ये खळबळ उडाली आहे तारकेश्वर गडाचे मार्गदर्शक आणि ज्येष्ठ कीर्तनकार समाज प्रबोधनातून हिंदुत्वाचा हुंकार भरणारे ह.भ.प.आदिनाथ शास्त्री महाराज यांनी स्वतःवर धारदार वस्तूने वार केल्याची माहिती समोर आली असून या घटनेत ते गंभीर जखमी झाले आहेत घटनेची माहिती मिळताच त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे सुदैवाने डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर आता महाराजांची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.



तारकेश्वरगड हा बालब्रह्मचारी नारायण महाराजांच्या गादीचा वारसा चालवणारा आणि शुद्ध वारकरी परंपरेचा पाईक मानला जातो आदिनाथ शास्त्री महाराज हे केवळ एक महंत नसून ते हजारो तरुणांचे मार्गदर्शक आणि अध्यात्मातील चालता-बोलता ज्ञानकोश मानले जातात ज्ञानेश्वरीचा गाढा अभ्यास आणि व्यसनमुक्तीच्या कार्यात त्यांचे योगदान अमूल्य आहे अत्यंत शांत संयमी आणि विद्वान व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदिनाथ शास्त्री महाराजांनी इतके टोकाचे पाऊल का उचलले या प्रश्नाने भाविकांच्या काळजाचा ठोका चुकला आहे या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच अहिल्यानगर बीड आणि पाथर्डी परिसरातील अफाट भक्तवर्ग काळजीत पडला असून सोशल मीडियावर '' काळजी देवाला ''अशा पोस्ट करत भक्त आदिनाथ शास्त्री महाराजांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करत आहेत अध्यात्म आणि शिस्तीचा डोंगर मानल्या जाणाऱ्या महंतांच्या या कृतीमुळे वारकरी संप्रदायात मोठी अस्वस्थता पसरली आहे घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि ज्येष्ठ भाविकांनी रुग्णालयात धाव घेऊन महाराजांच्या प्रकृतीची विचारपूस केली पोलीस प्रशासनानेही या प्रकरणाची तातडीने दखल घेतली असून प्राथमिक चौकशी सुरू केली आहे या घटनेमागे काही वैयक्तिक कारणे होती की अन्यकाही मानसिक तणाव याचा सखोल तपास पोलिसांकडून केला जात आहे तारकेश्वर गडाची पवित्र गादी आणि महाराजांचे सात्विक जीवन पाहता या घटनेने भक्तांना मोठा धक्का बसला असून पुढील तपासातूनच या दुर्दैवी घटनेमागील नेमके सत्य समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# वाशीमध्ये राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाची मध्यरात्री धडक कारवाई

धाराशिव। प्रतिनिधी

धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने मध्यरात्री धडक कारवाई करत गोवा राज्यातच विक्रीस असलेली विदेशी दारू साठवणूक प्रकरण उघडकीस आणले. या कारवाईत सुमारे ९ लाख ४९ हजार ५९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मा. आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे (दक्षता व अंमलबजावणी), विभागीय उपआयुक्त संगीता दरेकर (छ. संभाजीनगर विभाग) तसेच अधीक्षक हर्षवर्धन शिंदे (राज्य उत्पादन शुल्क, धाराशिव) यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, दि. १४ मार्च २०२६ रोजी वाशी ते पारा रोडवरील सर्वे क्रमांक १६६ येथील कच्च्या बांधकामाच्या घरावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने छापा टाकला. या ठिकाणी गोवा राज्य निर्मित व केवळ गोव्यात विक्रीस असलेली विदेशी दारू अवैधरित्या साठवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली मारुती स्विफ्ट डिझायर ही चारचाकी कारही जप्त करण्यात आली. या प्रकरणी आकाश कुमार शेरकर (वय २२, रा. वाशी), सुनिल सुरेश कवडे (वय ३५, रा. भवानीनगर, वाशी) यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत कलम ६५ (ई), ८०, ८१, ८३, ९० व १०३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मध्यरात्री १.३० ते पहाटे ४.३० या वेळेत करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ९,४९,५९० रुपये इतकी असल्याची माहिती विभागाने दिली.

आरोपींना वाशी येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १६ मार्च २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई अधीक्षक हर्षवर्धन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्र. निरीक्षक बाळकृष्ण त्रिंबक ढोकरे यांच्या पथकाने केली. या पथकात ए. ए. गवंडी, टी. एच. नेर्लेकर, ए. सी. खराडे, ए. डी. गटकांबळे, संतोष कलमले, महिला जवान ऐश्वर्या इंगळे, संग्राम झेंडे, ज्ञानेश्वर गुंजाळ, चैतन्य मोरे यांचा सहभाग होता. पुढील तपास प्र.निरीक्षक बाळकृष्ण ढोकरे करत आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री याबाबतची माहिती नागरिकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला कळवावी, असे आवाहन अधीक्षक हर्षवर्धन शिंदे यांनी केले आहे.

# लोकअदालतीत साडेपाच कोटींची प्रकरणे निकाली

हिंगोली। प्रतिनिधी

येथील तालुका विधी सेवा समितीच्या वतीने सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय मुंबई तसेच जिल्हा न्यायालय परभणी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली येथील न्यायालयात १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. एस. अकाली यांच्या हस्ते झाले.

यावेळी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. श्रीधर आर. घुगे, सचिव अ‍ॅड. मिलींद कांबळे तसेच जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी व विधीज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या लोकन्यायालयात प्रलंबित असलेली ५०१ प्रकरणे तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी, विविध बँका, ग्रामपंचायत व नगरपालिका यांची वाद दाखलपूर्व ३ हजार ६२७ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी प्रलंबित १२८ प्रकरणे व




दाखलपूर्व ३ प्रकरणे अशी एकूण १३१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या लोकअदालतीत प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणांमध्ये तडजोडीच्या आधारे एकूण ५ कोटी ५८ लाख ९१ हजार ६५३ रुपये इतक्या रकमेवर समझोता करण्यात येऊन संबंधित प्रकरणे निकाली काढण्यात आली.

या लोकन्यायालयासाठी हिंगोली येथील न्यायिक अधिकारी व विधीज्ञ यांचा समावेश असलेली एकूण सहा पॅनल गठीत करण्यात आली होती. या पॅनलचे प्रमुख म्हणून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष टी. एस. अकाली यांच्या मार्गदर्शनाखाली एस.एन. माने-गाडेकर, आर. एस. रोटे, पी. जी. महाळंकर, पी. आर. पमनानी, डी. व्ही. भंडारी, एस. एस. पळसुळे यांनी कामकाज पाहिले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. एस. अकाली यांनी पुढील ९ मे रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय लोकन्यायालयात जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून ती तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन करण्यात आले. लोकन्यायालयात एक वर्षापूर्वी झालेल्या अपघातात समरजितसिंग रघुवंशी यांचे निधन झाले होते. त्यांच्या पत्नी आरती रघुवंशी यांनी नुकसान भरपाईसाठी जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सदर प्रकरण तडजोडीने निकाली निघून लिबर्टी जनरल इन्शुरन्स कंपनीकडून त्यांना ५७ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे निश्चित करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. एस. अकाली यांच्या हस्ते त्यांना धनादेश प्रदान करण्यात आला. हे प्रकरण आर. एस. रोटे यांच्या पॅनलवर निकाली काढण्यात आले.

# देशी गोवंश संवर्धनाला चालना देण्यासाठी गौ-टेक परिषद

## २० ते २३ मार्च दरम्यान आयोजन, पशुपालक, पशुतज्ज्ञ आणि प्रक्रिया उद्योजक येणार एकत्र

पुणे । प्रतिनिधी

कृषी, आरोग्य आणि संस्कृतीच्या दृष्टीने देशी गोवंशाचे संगोपन महत्त्वाचे मानले जाते. देशी गोवंश संवर्धन, संशोधन आणि त्यावर आधारित प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी पुण्यात 'गौ-टेक २०२६' आंतरराष्ट्रीय शिखर परिषद आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या माध्यमातून देशभरातील पशुपालक, पशुतज्ज्ञ आणि प्रक्रिया उद्योजक एकत्र येणार असून, देशी गोवंश संगोपन व व्यवस्थापनातील नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा संकल्प आहे, अशी माहिती राष्ट्रीय कामधेनू आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. वल्लभभाई कथिरिया यांनी दिली. 'जीसीसीआय' आणि महाराष्ट्र गौसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे २० ते २३ मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन कृषी महाविद्यालयाच्या मैदानामध्ये होणार आहे. रविवारी (ता. १५) प्रदर्शन स्थळाच्या भूमिपूजन प्रसंगी डॉ. कथिरिया यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. शेखर मुंदडा म्हणाले, ''देशी गोवंशाच्या संवर्धनाच्या बरोबरीने गो आधारित उद्योग, सेंद्रिय शेती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाला गती देण्यासाठी या प्रदर्शनाच्या निमित्ताने गोशाळा संमेलन होणार आहे.

यामध्ये देशी गोवंशाचे शास्त्रीय पद्धतीने संगोपन, प्रक्रिया उद्योग, सेंद्रिय शेती आणि उत्पादनांच्या विक्रीबाबत विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. याचबरोबरीने पशुपालकांसाठी देखील विशेष चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनात विविध गो उत्पादने, शेणापासून तयार केलेला रंग, विटा, विविध वस्तू निर्मितीसाठी यंत्र सामुग्री, दुग्धजन्य पदार्थाचे स्टॉल असणार आहेत.'' खासदार डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, की येत्या काळात देशी गोवंशाच्या संगोपनासोबत सेंद्रिय शेती, ऊर्जा निर्मिती, प्रक्रिया उद्योगांना चालना मिळणार आहे. याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेला फायदा होईल. शहरी ग्राहक आणि ग्रामीण उद्योजकांना जोडण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण असणार आहे. या वेळी उद्योजक कृष्णकुमार गोयल, अण्णा भरेकर, डॉ. नितीन मार्कंडेय, रमेशभाई रूपारेलिया, भरतभाई राजपुरोहित, संजय भोसले, डॉ. कुलकर्णी, महेंद्र देवी आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाथर्डी पुरवठा विभागाचा डॉबरमॅन अंदाधुंदी कारभार

## भ्रष्ट कर्मचाऱ्यांच्या चौकशीची रमेश गोरे यांची मागणी

पाथर्डी प्रतिनिधी। प्रतिनिधी

पाथर्डी येथील पुरवठा विभागात सध्या कमालीचा डॉबरमॅन अंदाधुंदी कारभार सुरू असून यामुळे सर्वसामान्यांना वारंवार नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे येथील बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीने खातेनिहाय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजी नगरसेवक रमेश गोरे यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रमेश गोरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नवीन रेशन कार्ड मिळवणे नावातील दुरुस्ती किंवा विभक्त रेशन कार्डसाठी अर्ज केल्यानंतर नागरिकांना अनेक महिने कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात अर्जदाराला रीतसर पावती देऊन एक महिन्याने बोलावले जाते महिनाभरानंतर गेल्यावर तुमचा पहिला अर्ज सापडत नाही असे सांगून पुन्हा नवीन अर्ज करण्यास भाग पाडले जाते अनेक गरजवंतांनी आतापर्यंत तीन ते चार वेळा अर्ज भरले आहेत परंतु त्यांना न्याय मिळालेला नाही ऑनलाइन बंद आहे' साईट चालत नाही किंवा महसूल अधिकाऱ्यांचे सही झाली नाही अशी तांत्रिक कारणे सांगून नागरिकांची अडवणूक केली जाते मात्र त्याच ठिकाणी असलेल्या एजंटला भेटून आर्थिक तडजोड केल्यास तेच काम तातडीने मार्गी लागते रीतसर मार्गाने जाणाऱ्या सामान्य नागरिकांना मात्र एका रेशन कार्डसाठी आठ ते दहा महिने हेलपाटे मारावे लागत आहेत विशेष म्हणजे हा सर्व प्रकार वेळोवेळी तहसीलदार यांच्या निदर्शनास आणून देऊनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही तहसीलदारांचा कर्मचाऱ्यांवर कोणताही वचक राहिला नसल्याचे दिसून येत आहे त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून भ्रष्ट बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी अशी आग्रही मागणी रमेश गोरे यांनी निवेदनातून केली आहे.

# जिंतूरात स्मार्ट मीटरवरून नागरिकांमध्ये संताप

परभणी। प्रतिनिधी

जिंतूर शहरात वीज ग्राहकांच्या घरांमध्ये नवीन स्मार्ट (डिजिटल) मीटर बसविण्याच्या कामावरून नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. एका खासगी कंपनीमार्फत हे स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू असून नागरिकांच्या संमतीशिवाय बळजबरीने मीटर बसवले जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकाराविरोधात संतप्त नागरिकांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देत हे काम तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे.

नागरिकांच्या तक्रारीनुसार, स्मार्ट मीटर बसवल्यानंतर अनेक वीज ग्राहकांना अवाजवी वीज बील येत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. यामुळे सामान्य नागरिक, शेतकरी, मजूर तसेच मध्यमवर्गीय कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वीज बील जास्त आल्यास ते तात्काळ भरता न आल्यामुळे संबंधित ग्राहकांचा वीज पुरवठा रिमोट प्रणालीद्वारे अचानक खंडित केला जात असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे. विशेष म्हणजे बील भरल्यानंतरही अनेकदा १० ते १२ दिवसांनीच वीज पुरवठा पूर्ववत केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने वीज खंडित झाल्यास नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, स्मार्ट मीटर बसविण्याचे काम काही स्थानिक कंत्राटदारांमार्फत केले जात असून, काही कंत्राटदार आर्थिक फायद्यासाठी नागरिकांवर दबाव टाकत असल्याच्या तक्रारी देखील समोर येत आहेत. तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार कोणालाही स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती करता येत नसतानाही संबंधित कंपनीकडून या आदेशांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सोलर प्लांट बसवलेल्या ग्राहकांनाही स्मार्ट मीटरमुळे अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सांगण्यात येत आहे. सोलर प्लांट असूनही अपेक्षितप्रमाणे बील कमी न होता उलट जादा बिल येत असल्याने ग्राहकांमध्ये नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर जिंतूर शहरात बळजबरीने स्मार्ट मीटर बसविण्याची कारवाई तात्काळ थांबवावी, अवाजवी वीज बिलांची चौकशी करावी आणि रिमोट पद्धतीने वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई बंद करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# शिक्षक साहित्य संमेलन पुन्हा लांबणीवर

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने १७ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेले तिसरे शिक्षक साहित्य संमेलन पुन्हा लांबणीवर गेले आहे. शिक्षण विभागाकडून या संमेलनासाठी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची वेळ मिळविण्याचा प्रयत्न सुरू होता. परंतु मंत्री भुसे यांची वेळ मिळत नसल्याने हे संमेलन लांबणीवर पडल्याचे आता सांगण्यात येत आहे. शिक्षकांच्या साहित्यिक अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळून देण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात शिक्षक संमेलनाची सुरुवात झाली.

या साहित्य संमेलनाचे हे तिसरे वर्ष आहे. मात्र यंदा संमेलनाचे वेळापत्रक दोन वेळा बदलण्याची वेळ शिक्षण विभागावर आली आहे. याआधी हे संमेलन ६ फेब्रुवारी रोजी होणार होते. इयत्ता पहिली ते बारावीच्या सर्व शाळांच्या अठाराशे शिक्षकांना या संमेलनासाठी निमंत्रित करण्यात आले होते.

परंतु ऐनवेळी संमेलन पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर १७ मार्च रोजी संमेलन घेण्याचे ठरले. तशी तयारीही करण्यात आली, परंतु आता पुन्हा एकदा हे संमेलन पुढे ढकलण्यात आले आहे. शिक्षण मंत्री दादा भुसे यांची वेळ न मिळाल्याने हे संमेलन पुढे ढकलल्याचे सूत्रांनी सांगितले. संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. संजय गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनानिमित्त काढण्यात आलेल्या स्मरणिकेमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा, या विषयावर १२८ शिक्षकांनी लेख दिलेले आहेत. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर आहेत.

# अंजिठा येथील अंधारी शिवारात बिबट्यांचा थरार

संभाजीनगर। प्रतिनिधी

अजिंठा परिसरातील अंधारी शिवारात रात्रीच्या वेळी बिबट्यांच्या जोडीने शेळ्यांवर हल्ला करून चार शेळ्यांचा फडशा पाडला, तर आणखी चार शेळ्या उचलून नेल्याची घटना घडली. मात्र काही शेतकऱ्यांच्या धाडसाने नर बिबट्याला जिवंत पकडण्यात यश आले. यावेळी शेतात असलेल्या मादी बिबट्याने चौघांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. रात्रभर तिच्या डरकाळ्यांचा आवाज घुमत असल्याने परिसरात मोठा थरार निर्माण झाला.

अजिंठा येथील एका शेतातील वाड्यात शुक्रवारी रात्री नर-मादी बिबट्यांच्या जोडीने चार शेळ्यांचा फडशा पाडला होता, तर चार शेळ्या उचलून नेण्यात आल्या. यात संबंधित शेतकऱ्याचे जवळपास एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेचा पंचनामा अजिंठा वन विभागाने केला होता. त्यानंतर रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास हेच



बिबट्यांचे जोडपे पुन्हा त्या शेतात शेळ्यांच्या शिकारीसाठी आले होते. त्यावेळी काही जण शेतात काम करत होते. अचानक शेतातील वीस बाय चाळीस आकाराच्या दोन खोल्यांच्या बांधकामात एक बिबट्या शिरताना त्यांच्या नजरेस पडला. प्रसंगावधान राखत त्यांनी तात्काळ खोलीची कडी-कोंडी दोरीने घट्ट बांधून दुसरे टोक खुट्याला बांधले आणि नर बिबट्याला आत कोंडून ठेवले. खुंट्याला दोरी बांधताना बाहेर आणखी एक बिबट्या फिरत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. बाहेर असलेल्या मादी बिबट्याने चौघांवर झडप घालण्याचा प्रयत्न केला. ती सुमारे चाळीस ते पन्नास फुटांपर्यंत येऊन डरकाळ्या फोडत त्यांना घाबरु लागली. मात्र हातात लाठ्या असल्यामुळे चौघांनी धैर्य दाखवत तिला हुसकावून लावले. काही वेळ ती वारंवार अंगावर येण्याचा प्रयत्न करत होती; परंतु चौघे जण असल्याने अखेर ती माघार घेत शेतात जाऊन लपून बसली. रातभर शेतातून तिच्या डरकाळ्यांचा आवाज घुमत होता. शेतमजुरांनी तातडीने शेतमालकाला फोन करून घटनास्थळी बोलावून घेतले. शेतमालकासह २५ ते ३० शेतकरी तेथे धावून आले आणि त्यांनी अजिंठा वन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच वन परिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांच्यासह वनपाल दीपक सोनार, वनरक्षक शेख मोईनुद्दीन, अशोक दांडगे, शरद चेके, समाधान मोरे, योगेश शिंदे, योगेश साळवे तसेच वनमजूर राजू झोंड, भास्कर शहाणे, शिवाजी मुळे, मुकेश गुप्ता, सचिन झोड आदी पथकासह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी ग्रामस्थ आरीफ खान मेवाती, फकिरा पठाण मेवाती, सादिक खान मेवाती, आदिल खान मेवाती, सलीम खान मेवाती, शकील खान मेवाती, उमर खान मेवाती यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# महसूलचा पवनचक्की कंपनीला दणका; २ लाख ५३ हजार दंड वसूल

लातूर। प्रतिनिधी

पवनचक्कीच्या कामासाठी निलंगा तालुक्यातील केळगाव येथील एका शेतकऱ्याच्या मालकी हक्कातील गौण खनिज अवैधरीत्या उपसा केल्याप्रकरणी महसूल विभागाने पवनचक्की कंपनीकडून २ लाख ५३ हजाराचा दंड वसूल करण्यात आला आहे.

निलंगा तालुक्यातील केळगाव व राठोडा, उमरगा (हा), लांबोटा, दापका परीसरातील शेतकऱ्यांना मोठ्या पैशाचे आमिष दाखवून दलालांची टोळी उभारुन पवनचक्की उभारण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. या भागात जवळपास दहा ते बारा पवनचक्की उभारण्याच्या परवानगी घेण्यात आल्याची माहिती समोर आली असून त्यातील चार पवनचक्कीचे काम प्रत्यक्षात सुरू झाले आहे. राठोडा शिवारात पवनचक्कीच्या कामासाठी केळगाव येथील एका शेतकऱ्याच्या मालकीच्या डोंगर पायथ्याची जेसीबीने उत्खनन करुन मोठ्या प्रमाणात गौण खनिज उपसा करण्यात आल्याचा प्रकार समोर आला. महसूल प्रशासनाने तात्काळ कारवाईचा



बडगा उगारत तलाठी व मंडळाधिकारी यांच्या मार्फत चौकशी करून अहवाल मागतत तब्बल २ लाख ५३ हजाराचा दंड वसूल केला आहे. एका पवनचक्की कामाचे पितळ उघडे पडले म्हणून प्रशासनाने संबंधितांकडून दंड भरुन घेतला. आणखीन चार पवनचक्कीचे काम पूर्ण झाले असून पाच ते सहा ठिकाणी काम प्रगतीपथावर आहे. त्या ठिकाणी वापरण्यात आलेल्या गौणखनिज उपसा बाबत महसूल विभाग दंड वसूल करणार का? नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# फुलाईनगर येथे साडेसहा लाखाचा गुटखा पकडला

बीड । प्रतिनिधी

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन बीड शहर हद्दीतील फुलाईनगर बीड येथुन स्वीफ्ट कार क्र.-४३/-५७२५ मध्ये बेकायदेशिररित्या विविध कंपनीचा गुटखा विक्री करण्यासाठी घेवुन जात आहेत. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/राहुल शिंदे, पोह/युनुस बागवान, मपोह/स्वाती मुंडे, पोअं/अशपाक सय्यद, पोअं./मनोज परजणे, चालक पोह/नितीन वडमारे सर्व नेमणुक स्थागुशा बीड असेनी मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जावुन दि.१६ मार्च रोजी ८.३० च्या सुमारास छापा मारला असता. सदर ठिकाणी एका स्वीफ्ट कारमध्ये भाऊसाहेब राम पडुळे वय ३४ वर्षे रा. औरंगपुर ता.जि.बीड ह.मु.स्वर्णनगरी फुलाईनगर बीड हा त्याच्या आर्थिक फायद्याकरीता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित केलेला वेगवेगळ्या कंपनीचा गुटखा ताब्यात बाळगुन त्याची स्वीप्ट कारमध्ये विक्री करण्यासाठी वाहतुक करीत असतांना एकुन ६,६८,१८४/- रुपयाच्या मुद्देमालासह मिळुन आला. अवैध गुटखा साठे बाजी करणाऱ्याच्या विरोधात आज पर्यंत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अनेक ठिकाणी धाडी टाकून लाखो रुपयांचा गुटखा जप्त केला. मात्र जी गोष्ट स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना



माहीत होते ती बाब संबंधित पोलीस ठाण्याच्या स्थानिक पोलिसांना कशी काय माहित नसते हा मोठा प्रश्न आहे.

सदरचा गुटखा त्याने रेवन्नाथ चादर रा.भाटसांगवी ता.जि.बीड (फरार) याचे कडुन घेवुन आल्याचे चौकशीमध्ये सांगीतले असुन नमुद दोन्ही आरोपी विरूध्द पोस्टे बीड शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्ह्यात आणखीन कोणी आरोपीचा सहभाग आहे काय ?

याबाबत स्थानिक गुन्हे शाखा बीड व पोलीस ठाणे बीड शहर पोलीस तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/राहुल शिंदे, पोह/युनुस बागवान, मपोह/स्वाती मुंडे, पोअं/अशपाक सय्यद, पोअं./मनोज परजणे, चालक पोह/नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी पेठबीड पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पत्र्याचे शेडमध्ये स्थानिक गुन्हे शाखेने लाखो रुपयांचा गुटखा पकडला. मात्र पेठ बीड पोलिसांना याचा थांग पत्ता नव्हता नेमके पोलीस ठाण्याचे कर्मचाऱ्यांनी आणी अधिकारी करतात काय? हा मोठा प्रश्न आहे. जिल्हाभरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाडी मारून लाखो रुपयांचा गुटखा पकडला. मात्र स्थानिक पोलिसांना याची माहितीही मिळाली नाही याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. वास्तविक पाहता पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैध धंदे गुटखा, दारू, पत्त्याचे क्लब बंद करण्याची जबाबदारी स्थानिक पोलिसांची आहे. मात्र तरीही स्थानिक गुन्हे शाखेला जिल्हाभरात धाडी मारून अवैध धंदे बंद करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात ही दुर्दैवाची बाब आहे.

## तणावपूर्ण जीवनात अध्यात्माची गरज –राजेंद्र मस्के
## वरवटीत अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

बीड । प्रतिनिधी

''हरी नाम ही मानव जीवनाला संजीवनी देणारी दिव्य शक्ती आहे. गावोगावी आयोजित होणारा अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे सामूहिक भक्तीचा पवित्र यज्ञ असून त्यातून समाजात आध्यात्मिक ऊर्जा निर्माण होते, सौहार्दाचे वातावरण तयार होते आणि मानव जन्माचा खरा अर्थ उमगतो,'' असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले.

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील वरवटी येथे आयोजित



अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात ते बोलत होते. हभप माऊली महाराज मंझरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची भक्तीपूर्ण वातावरणात सांगता झाली.

सप्ताहाच्या निमित्ताने गावात सात दिवस हरिनामाचा अखंड गजर, भजन-कीर्तन, हरिपाठ तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला होता. ग्रामस्थांसह वारकरी भाविकांनी मोठ्या श्रद्धा आणि उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

यावेळी पुढे बोलताना मस्के म्हणाले की, आजच्या धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनशैलीत अध्यात्माचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. हरिनाम सप्ताहासारखे उपक्रम समाजाला सकारात्मक दिशा देतात. हरिनामाच्या स्मरणातून मन शुद्ध होते, विचार निर्मळ होतात आणि परस्परांमधील भेदभाव कमी होऊन बंधुभाव वृद्धिंगत होतो.

ते पुढे म्हणाले, ''सहकार्य, साधेपणा, परस्पर स्नेह आणि सामूहिक ◀◀ पान २ वर

## अंबाजोगाईत महिला क्रिकेटची मुहूर्तमेढ माही परमार यांनी रोवली – डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या क्रिकेट प्रशिक्षिका तसेच क्रीडा पत्रकार माही परमार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रात महिलांनी केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि समाजात त्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

अंबाजोगाई क्रिकेट



अकॅडमी ही संस्था स्थानिक पातळीवर क्रिकेटला चालना देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. ग्रामीण आणि शहरातील युवा खेळाडूंना संधी उपलब्ध करून देणे, त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे तसेच क्रीडा क्षेत्रात नवे खेळाडू घडवणे हा अकॅडमीचा मुख्य उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर दरवर्षी सातत्याने विविध क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या जातात.

या स्पर्धेदरम्यान विविध सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत अनेक प्रेरणादायी सामाजिक उपक्रम देखील राबवण्यात येत आहेत. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने क्रीडा क्षेत्रात महिलांचे योगदान अधोरेखित करण्याच्या उद्देशाने क्रिकेट प्रशिक्षिका तथा क्रीडा पत्रकार माही परमार यांचा अंबाजोगाईतील क्रिकेट मधील अमूल्य योगदाणाबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह ◀◀ पान २ वर

## मनोज पवार यांच्या वतीने इफ्तार पार्टी

अंमळनेर । प्रतिनिधी

पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांना सामूहिक प्रार्थना करून इफ्तार पार्टीचे अंमळनेर येथे ग्रामपंचायत कार्यालयच्या प्रांगणात मनोज पवार सर यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते या वेळी इफ्तार पार्टीत शेकडो हिंदू-मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.



रमजान महिन्यात मुस्लिम बांधव उपवास करतात. उपवास सोडण्यासाठी रोजा इफ्तारचे आयोजन केले जाते. या महिन्यातील अखेरचे पाच ते सहा दिवस रात्रभर जागून प्रार्थना केली जाते. रात्रभर जागल्यानंतरही शेकडो मुस्लिम बांधव या इफ्तार पार्टीला उपस्थित होते. अनेक मुस्लिम बांधवांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

यावेळी अंमळनेर पोलीस स्टेशनचे कर्मचारी पी एस आय चव्हाण साहेब, बहिरवाळ साहेब , मनोज पवार सर, मेंबर पिनू पोकळे, शफिक शेठ इनामदार, शब्बीर बागवान ,सत्तार आत्तार,कादरभाई ताबोळी, इम्रान पठाण, हुसेन ताबोळी, शेख चाचा, अहमद पठाण, अहमद सय्यद, शोकत बागवान, सलमान आत्तार , मुन्ना सय्यद,सोमा पांगरे, मुरलीधर पवार, विक्रम पवार, ऋषीं पवार,अमीर इनामदार, मुबारक, अमन सय्यद, मोबीन बागवान, फिरोज बागवान, प्रशांत पवार, भागवत नवले, विठ्ठल नवले, अभिजित पथरूडकर, अनिल हडतगुणे,अण्णा पवार तसेच पाटोदा तालुका ग्रामीण पत्रकार संघ , पत्रकार बबन उकांडे, भाऊसाहेब पवार, चंद्रकांत पवार,शेखर पवार,विशाल पोकळे, अविराज पवार, नितीन पवार आदीजण उपस्थित होते.

## शिरूर कासार तालुक्यात रानडुकरामुळे शेतकरी हैराण

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यात सध्या जंगली रानडुक्करांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढला असून शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे. रानडुक्करांचा कळप एखाद्या शेतात घुसला की एकाच रात्रीत किमान एक एकर पीक उध्वस्त करून टाकतो, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी विविध उपाय करत असले तरी त्याचा फारसा उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. काही शेतकरी शेताभोवती तार लावून त्यात करंट सोडण्याचा प्रयत्न करतात, मात्र त्यामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण होतो. जाळी लावली तरी रानडुक्कर ती तोडून आत शिरतात. परिणामी शेतकऱ्यांच्या मेहनतीने उभे केलेले पीक एका रात्रीत नष्ट होत आहे.

एकीकडे निसर्गाच्या लहरीपणाचा फटका तर दुसरीकडे जंगली प्राण्यांचा वाढता त्रास अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. काही शेतकरी स्वतः रात्री ◀◀ पान २ वर

## माजी आ.बाळासाहेब आजबे यांच्या वतीने आष्टीत इफ्तार पार्टी संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या वतीने पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून आष्टी येथे मुस्लिम बांधवांसाठी सोमवार दिनांक १६ मार्च रोजी सायंकाळी ६:४४ वाजता इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते .

माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या वतीने आयोजित इतर पार्टीच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, सर्वधर्मसमभाव, बंधुभाव आणि



सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. आष्टीपाटोदाशिरूरमतदारसंघात हिंदू मुस्लिम ऐक्य व बंधू भावाचा संदेश देण्यासाठी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यावतीने इफ्तार पार्टीचे दरवर्षी आयोजन करण्यात येते या पार्टीसाठी सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतात व मोठ्या उत्साहामध्ये एकत्र येत इफ्तार पार्टीचा आनंद घेतात. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव दिवसभर कडक उपवास (रोजा) पाळतात आणि सूर्यास्ताच्या ◀◀ पान २ वर

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला कचऱ्याची टोपली

### छत्रपती शिवाजी महाराज शिबिराकडे अधिकाऱ्यांची पाठ!

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्ह्यात सामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज शिबिर' अत्यंत प्रभावीपणे राबवण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, पाटोदा तालुक्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला स्थानिक अधिकाऱ्यांनीच खो दिला असल्याचे चित्र समोर आले आहे. तालुक्यातील कुसळंब आणि दासखेड येथे आयोजित शिबिरांना पाटोद्याचे गटविकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी हे अनुपस्थित राहिल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या शिबिरांच्या माध्यमातून सर्व विभागाच्या प्रमुखांनी सक्तीने उपस्थित राहून लोकांच्या समस्यांचे निराकरण करावे, अशा स्पष्ट सूचना लेखी पत्राद्वारे दिल्या होत्या. त्यानुसार कुसळंब आणि दासखेड येथे शिबिरांचे नियोजन करण्यात आले. मात्र, या दोन्ही महत्त्वाच्या ठिकाणी पाटोदा तालुक्याचे गटविकास अधिकारी () उद्धव सानप आणि तालुका कृषी अधिकारी ओंकार शेळके हे फिरकलेच नाहीत.****

संपर्क क्षेत्राबाहेर; जनतेत संताप

दोन्ही जबाबदार अधिकारी शिबिरास गैरहजर राहिल्याने ग्रामस्थांनी आणि उपस्थित नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले. यासंदर्भात या दोन्ही अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः आदेश काढूनही जर तालुकास्तरीय अधिकारी अशा महत्त्वाच्या लोककल्याणकारी शिबिरांकडे दुर्लक्ष करत असतील, तर सामान्यांचे प्रश्न सुटणार कसे? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

आता कारवाई होणार का?

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या या दोन्ही अधिकाऱ्यांवर प्रशासन आता काय कारवाई करणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. ''शासन आपल्या दारी'' आणण्याच्या प्रयत्नांना अशा कामचुकार अधिकाऱ्यांमुळे खीळ बसत असल्याची चर्चा सध्या पाटोदा तालुक्यात रंगली आहे. आता या प्रकरणाचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्यानंतर ते यावर काय भूमिका घेतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## विकास साळवे यांना रुग्णसेवक, जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार

आष्टी । प्रतिनिधी

मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार शिवश्री विकास उत्तम साळवे यांना रुग्णसेवा यांना जाहीर झाला असून बीड सांगवी येथील जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला मेळाव्याचे निमित्ताने आदरणीय लोकनेते आ सुरेश आण्णा धस यांचे सौभाग्यवती आदरणीय प्राजक्ता ताई सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते सत्कार व सन्मान केला आहे.

गोर गरीबांचे सर्व सामान्य माणसाला आधार मदतीला धावून जाणारे आरोग्यदुत म्हणून ओळखले जाणारे नेतृत्व आदरणीय लोकनेते आ सुरेश आण्णा धस व प्रजाकाताई सुरेश धस यांच्या माध्यमातून मार्गदर्शकाखाली गोरं गरीबा रुणला आर्थिक



सहकार्य मदत मिळुन लोकांना मदतीला वेळी वेळी सहकार्य केले जात आहे त्यामुळे यांना राज्यस्तरीय जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार रुग्णसेवा प्रदान करुन सन्मानित केले आहे राजामता जिजाऊ माँ साहेबांच्या प्रेरणादायी विचारांचे आदर ठेवून समाज उन्नती, जनजागृती, व लोकहितासाठी उल्लेखनी कार्याची दखल घेऊन यांना पुरस्कार दिला आहे आपल्या पुढील कार्यासाठी आमदार श्री सुरेश आण्णा धस,मा प्राजक्ता ताई सुरेश आण्णा धस, मदनदा सांचालिका मुंबई ,मा शिवमती वर्षाताई माने, मा शिवमती तेजश्री मुळे, मा इजि तानाजी जजिरे, युवा नेता जयदत्त भैय्या धस,सागर आपा धस, गणेश नाना शिंदे,व शिवमती सुवर्ण गिरे, एडवोकेट कांतीनाला गव्हाणे , लक्ष्मण रेडकर सर, सुरेश पवार सर, अडवोकेट सिताराम पोकळे, प्राध्यापक बाबासाहेब मुटकुळे, दादासाहेब पवळ, शितल ताई करांडे, आशा करांडे. अंकुश तळेकर राज मस्के अशोक मुटकुळे प्राध्यापक दत्ता नरसाळे जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे अविनाश कदम,समीर शेख अमोल जगताप, शरद रेडेकर ,जिजाऊ ब्रिगेड माधुरी तवले ,अर्चना पोकळे, विद्याताई चव्हाण, वर्ष शिंदे, ◀◀ पान २ वर

# कवडगाव बु येथे दोन ठिकाणी धाडसी चोरी लाखोंचा ऐवज लंपास

### गेल्या ६ महिन्यात ६ठिकाणी दरोडे, पोलीसांना तपास लागेना, एस.पी.कावतसाहेब जरा तुम्हीच जातीने लक्ष घाला.गावात भित्तीचे वातावरण

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव बु येथे काल पहाटे अंदाजे ३वाजेच्या सुमारास दोन ठिकाणी धाडसी चोरी होउन चोरट्यांनी लाखोंचा ऐवज लंपास केला आहे शे.अनिस शे.अहमद यांचे घरी प्रथम व युवराज शिवाजी काळे यांच्या घरावर दुसर्यांदा डल्ला मारत लाखोंचा ऐवज लंपास केला आहे वडवणी पोलीस स्टेशनच्या पो.नि.वर्षाताई व्हगाडे या पहाटे ४वा.घटनास्थळी दाखल झाल्या तर सकाळी ९वा.श्वानपथकही दाखल झाले आहे विशेष म्हणजे दरोडेखोर हे सशस्त्र होते त्यांनी घरातील व्यक्तींना धारदार शस्त्राचा धाक दाखवून दरोडा टाकला त्यामुळे येथील






नागरिकांत भित्तीचे वातावरण निर्माण झाले आहे गेल्या ४महिन्याच्या काळात चोरट्यांनी धुमाकूळ घालत ६ठिकाणी दरोडे टाकले परंतु वडवणी पोलिसांना एकाही दरोड्याचा तपास लागला नाही तरी एस.पी.नवनीत कावतसाहेब आपणच या प्रकरणी लक्ष देऊन या दरोड्याचा तपास लावावा अशी मागणी करण्यात येत आहे प्रसंगी येथील नागरिक आंदोलनाच्या तयारीत दिसुन येत आहेत.

या बाबत अधिक माहिती अशी कि वडवणी तालुक्यातील कवडगाव बु येथे गेल्या ६महिन्यापासुन चोरट्यांचे सत्र चालुच असुन काल पहाटे ३वाजेच्या सुमारास येथील जुन्या गावातील शे.अनिस शे.अहमद यांचे घरी घराच्या पाठीमागील बाजुने चोरट्यांनी प्रवेश करत धुमाकूळ घातला घरातील नागरिकांना धारदार शस्त्राचा धाक दाखवत लाखोंचा ऐवज लंपास केला तदनंतर या घरापासून अवघ्या२००मिटर अंतरावर असलेल्या युवराज शिवाजी काळे यांच्या घरात पाठिमागुन प्रवेश करत घरातील महिला व पुरुषांना शस्त्राचा धाक दाखवून महिलांच्या अंगावरील तसेच कपाटाची मोडतोड करुन सोने चांदीचे दागिने लंपास ◀◀ पान २ वर

### गावातील तरूणांनी ग्राम सुरक्षा दल स्थापन करावे –दिपक खळगे

आपल्या गावातील चोरीचे वाढते प्रमाण बघता आता आपल्याला आपलीच स्वरक्षण व काळजी घ्यावी लागणार आहे म्हणजे गावाला गावातील तरुणांनी एकत्र येऊन ग्राम सुरक्षा दल स्थापन करावा लागेल व एक आपत्कालीन संपर्क नंबर असावा जेणेकरून काही अडचण आल्यास त्या नंबर वर संपर्क करून तात्काळ तिथे ग्राम सुरक्षा दल पोहोचतील तसेच पोलीस स्टेशन येथे व्हेरिफाय करून काही तरुणांना पोलीस मित्र म्हणून काहीची निवड करून त्यांना ओळखपत्र देण्यात यावे तसेच जे ग्राम सुरक्षा दल मध्ये सामील होतील त्यांना सुद्धा ग्रामपंचायत नि ओळखपत्र द्यावे अशा पद्धतीने जर केले तर बऱ्यापैकी अशा घटना कमी होतील अशी मागणी गजानन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष दिपक खळगे पाटील यांनी केली आहे.

### सर्व ठिकाणी चोरीची पद्धत सारखीच

आज पर्यंतच्या कवडगावात झालेल्या चोरी प्रकरणात ६जण चोरटे असुन तोंडावर काळा बुरखा व हातात हातमोजे घालूनच हे चोरटे चोरी करतात तसेच पैशावर फारसे लक्ष न करता ते फक्त सोने-चांदीच्या दागिण्यावरच लक्ष करतात आणखी प्रत्येक ठिकाणी चोरी करण्याची पद्धत सारखीच असल्याने सर्व प्रकरणात हेच चोरटे असणाच्यी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणेकरांना गुडन्यूज, गॅस बुकींगनंतर ९६ तासांत सिलेंडर घरपोच; जिल्हाधिकारी डुडींचे एजन्सींना आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी नववर्षारंभ म्हणजेच गुढी पाडव्याचा सण अवघ्या दोन-तीन दिवसांवर येऊन ठेपला असताना गॅस टंचाईमुळे (त्री) व्यवसायिक हतबल झाले आहेत. तर, घरगुती गॅसचीही टंचाई जाणवत असल्याने नागरिकांनी, ग्राहकांनी गॅस एजन्सीबाहेर रांगाच रांगा लावल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्यातील गॅस टंचाईवर सरकारकडून स्पष्टीकरण देण्यात आलं असून घरगुती गॅस सिलेंडरची कुठेही कमतरता नाही, असे सांगण्यात आलंय. आता, पुण्याच्या (झींपश) जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वाची घोषणा केली असून नागरिकांनी गॅस बुकींग केल्यानंतर ९६ तासांत म्हणजेच ४ दिवसांत त्यांना गॅस घरपोच मिळणार असल्याचे जितेंद्र डुडी यांनी म्हटलंय.





सरकारकडून व्यावसायिक गॅस पुरवठा बंद करण्यात आल्याने हॉटेल व्यवसायिक, खाणावळी, मेस आणि इतरही किचन उद्योगाला मोठा फटका बसला असून घरगुती गॅसचेही दर वाढविण्यात आले आहेत. अशातच, गुढी पाडव्याचा सण जवळ येऊन ठेपल्याने सध्या बाजारात गर्दी असून गॅस टंचाईमुळे नागरिक त्रस्त झाल्याचं पाहायला मिळत आहे. गॅस एजन्सीबाहेर रांगाच रांगा दिसून येतात. त्याच पार्श्वभूमीवर पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

पुण्यातील गॅस टंचाई संदर्भात महत्त्वाची बातमी समोर आली असून गॅस सिलेंडर बुकींग केल्यानंतर ९६ तासात पुणेकरांना घरपोच गॅस मिळणार आहेत. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबाबतचे आदेश जिल्हा प्रशासनाला व गॅस एजन्सींना दिले आहेत. मात्र, ग्राहकांकडून डिलिव्हरी कोड सांगितल्याशिवाय सिलेंडर दिला जाणार नाही. घरगुती गॅस सिलेंडरच्या वितरणाबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नवीन नियम लागू करण्यात आला आहे. त्यानुसार, आता पुणेकरांना ९६ तासात घरपोच सिलेंडर मिळणार आहे. त्यामुळे, गॅस टंचाईत पुणेकरांना काहीस दिलासा मिळाला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पोलिसांना सूचना

पुणे जिल्ह्यात घरगुती गॅस सिलिंडरचे वितरण सुरळीत आणि सुरक्षित पद्धतीने व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पोलिस विभागाला महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गॅस सिलिंडर वितरणावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी वेळोवेळी लक्ष ठेवावे. गॅस एजन्सी आणि गोदामांवर अनावश्यक गर्दी होऊ नये यासाठी संबंधित पोलिस स्टेशनने नियमित पाहणी करावी. गॅस एजन्सीकडून सिलिंडर वितरणासाठी पोलिस मदत मागितल्यास नियमानुसार मदत पुरवावी. तसेच, वितरणात अडथळा आणणे किंवा हस्तक्षेप झाल्यास संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी महोदयांनी दिल्या आहेत.

# प्रेयसीच्या कुटुंबीयांनी प्रियकराला संपवलं; आईला व्हिडिओ कॉलवर दिली धमकी, एफआयआरमधून धक्कादायक माहिती समोर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कोथरूड भागात एका २३ वर्षीय तरुणाची प्रेमप्रकरणातून निर्घृण हत्या (झींपश उीळाश छशुी)करण्यात आल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. नागेश संजय जाधव (वय २३, रा. शिवाजीनगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी कोथरूड पोलिसांनी मुलीच्या (झींपश उीळाश छशुी) नातेवाईकांसह अनेक जणांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.



नागेश जाधव याच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार, ही घटना शनिवार, १४ मार्च २०२६ रोजी रात्री घडली. नागेशचे कोथरूड परिसरातील एका मुलीशी मैत्रीचे नाते होते. शनिवारी सायंकाळी ७:१५ च्या सुमारास नागेशला एकाचा फोन आला आणि तो घराबाहेर पडला. रात्री ८:०३ वाजता आरोपींनी नागेशच्या आईला त्याच्याच मोबाईलवरून फोन केला. फोनवर आरोपीने शिवीगाळ करत म्हटले की, तुझा मुलगा नागेश आमच्या ताब्यात आहे, आम्ही त्याला मारले आहे. १० मिनिटांत येथे येऊन त्याला घेऊन जा, नाहीतर त्याला खाली टाकून देऊ. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, नागेशची आई आणि नातेवाईकांनी तात्काळ कोथरूडमधील मेगासिटी (एसएनडीटी जवळ) येथे धाव घेतली. तिथे नागेश छतावर विवस्त्र अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. काही महिला आणि पुरुष त्याला लाकडी दांडके, लाथा-बुक्क्यांनी मारहाण (झींपश उीळाश छशुी)करत होते. नातेवाईकांनी त्याला तातडीने आधी रत्ना हॉस्पिटल आणि नंतर ससून हॉस्पिटलमध्ये नेले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृत्यूपूर्वी नागेशने आपल्या आईला सांगितले की, त्याला मुलीने फोन करून बोलावले होते आणि तिथे गेल्यावर तिच्या कुटुंबीयांनी त्याला बेदम मारहाण केली. या प्रकरणी पोलिसांनी मुलीची आई, वडील, तसेच चुलत्या, आणि इतर नातेवाईक यांच्यासह १० हून अधिक जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या सर्वांनी संगनमत करून नागेशची हत्या केल्याचा प्राथमिक निष्कर्ष (झींपश उीळाश छशुी) पोलिसांनी काढला आहे. एका तरुणाची अशा प्रकारे नियोजनबद्ध रितीने हत्या केल्यामुळे कोथरूड आणि शिवाजीनगर परिसरात तणावाचे वातावरण आहे. आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. कोथरूड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पथके तैनात करण्यात आली आहेत.

# बारामतीत 'बिनविरोध'ची चर्चा फिस्कटणार?

## लक्ष्मण हाके निवडणुकीच्या मैदानात उतरणार; राजकीय समीकरणे बदलणार

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची चर्चा सुरू असतानाच आता या राजकीय समीकरणात नवा ट्विस्ट आला आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी ही निवडणूक लढवण्याचे संकेत दिले आहेत. बारामतीतील कार्यकर्त्यांकडून निवडणूक लढवण्याचा मोठा आग्रह होत असल्याचे त्यांनी सांगितले.



माध्यमांशी बोलताना हाके म्हणाले की, लवकरच बारामतीत जाऊन कार्यकर्त्यांसोबत व्यापक चर्चा केली जाईल. त्या बैठकीनंतर निवडणूक लढवायची की नाही आणि उमेदवार कोण असणार याबाबत अंतिम निर्णय जाहीर केला जाईल. इरीरारींळ लू-शश्रशलींळेप

दरम्यान, दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर होणाऱ्या पोटनिवडणुकीवर भाष्य करताना हाके यांनी सरकारवर टीका केली. दादांच्या निधनानंतर तिसऱ्याच दिवशी शपथविधी होतो, मग त्यांच्या निधनाचे दुःख आम्हीच का व्यक्त करायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हाके यांनी पुढे सांगितले की, ओबीसी समाजाचे अनेक प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीपासून ते वसतिगृहाच्या प्रश्नांपर्यंत अनेक मागण्यांसाठी आम्ही संघर्ष केला, मात्र त्याला न्याय मिळाला नाही. तसेच बारामतीतील एका वैद्यकीय महाविद्यालयाला देण्यात आलेले अहिल्यादेवी होळकर यांचे नाव बदलण्याच्या निर्णयालाही त्यांनी विरोध दर्शवला. लोकशाहीत निवडणुका बिनविरोध होणे योग्य नाही. अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी निवडणूक लढवणे हाच एक पर्याय असल्याचेही हाके यांनी स्पष्ट केले. तसेच खासदार सुप्रिया सुळे जर व्यावसायिक पद्धतीने राजकारण करत असतील तर आम्हीही तसेच राजकारण करू, असेही त्यांनी म्हटले.

# गॅस एजन्सी सरकारी देखरेखीखाली चालवाव्या; आमदार हेमंत रासने यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

गॅस सिलेंडर वितरणास विलंब, साठेबाजी, घरगुती गॅस व्यावसायिक वापरासाठी किंवा जास्त दराने विक्री करून शहरातील काही गॅस एजन्सी गॅस सिलेंडरची कृत्रीम टंचाई निर्माण करत आहे. त्याचा त्रास सर्वसामान्यांना होत आहे. शहरातील गॅस एजन्सी ताब्यात घेऊन त्या प्रशासनाच्या निगराणीखाली चालविण्यात याव्या अशी मागणी कसब्याचे आमदार हेमंत रासने यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



आंतरराष्ट्रीय युद्धामुळे इंधन पुरठ्यावर परिणाम होत असून देशभरात इंधनाच्या संभाव्य टंचाईबावत नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. सध्या पुणे शहरात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या उपलब्धतेबाबत नागरिकांकडून विविध तक्रारी येत आहेत. प्रामुख्याने शहरातील काही गॅस एजन्सीकडून जाणूनबुजून गॅस सिलिंडरची कृत्रिम टंचाई निर्माण करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे नागरिकांना गॅस घेण्यासाठी लाईनमध्ये उभे रहावे लागत आहे. नागरिकांना वेळेवर गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसून त्यांना फेऱ्या माराव्या लागत आहे. अनेक गॅस वितरण कार्यालयाबाहेर नागरिकांच्या रांगा लागल्या आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सर्व गॅस एजन्सीची तपासणी करून तात्पुत्या स्वरूपात या एजन्सी जिल्हा प्रशासनाने ताब्यात घ्याव्या. गॅस वितरणाच्या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रण राहण्यासाठी (गॅस सिलिंडरचा साठा, वितरण आणि दर) अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी यामुळे प्रशासनाच्या देखरेखीखाली नागरिकांना गॅसचे वितरण व्यवस्था सुरू राहील. शहरातील कृत्रीम टंचाई आणि काळाबाजार रोखण्यास मदत होईल. ज्या एजन्सीकडून कृत्रीम टंचाई भासवली जात आहे, त्यांची चौकशी करून कारवाई करावी, असे रासने यांनी सांगितले.

# पुणे जिल्हा परिषदेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प आज सादर

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचा सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्प तसेच सन २०२५-२६ चा अंतिम सुधारित अर्थसंकल्प मंगळवारी (दि. १७ मार्च) सकाळी ११ वाजता सादर करण्यात येणार आहे. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील हे अर्थसंकल्प सादर करणार आहेत.



शासनाच्या निर्देशानुसार, २७ मार्चपूर्वी जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प मंजूर करणे आवश्यक आहे. दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवड १८ मार्च रोजी होणार आहे. अध्यक्ष निवडीनंतर सर्वसाधारण सभा बोलावून अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेला किमान कालावधी उपलब्ध होत नसल्याने अखेर प्रशासकांकडून अर्थसंकल्प सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थसंकल्प सादर व मंजुरी प्रक्रियेसाठीचे सूचनापत्र काढण्यात आले आहे.

जिल्हा परिषद सभा नियमावलीनुसार नियमित सभा बोलाविण्यासाठी किमान १७ दिवसांपूर्वी सूचना देणे आवश्यक असते, तर तातडीची सभा बोलावण्यासाठीही किमान १२ दिवसांचा अवधी आवश्यक असतो. अध्यक्ष निवड १८ मार्च रोजी होत असून, शासनाने २७ मार्चपूर्वी अर्थसंकल्प मंजूर करण्याची मुदत दिली आहे. त्यामुळे उपलब्ध कालावधी अवघा नऊ दिवसांचा ठरत असल्याने ही प्रक्रिया प्रशासकांकडून पार पाडली जात आहे. १७ मार्च रोजी सादर होणाऱ्या या अर्थसंकल्पात सन २०२५-२६ चा अंतिम सुधारित अंदाजपत्रक तसेच सन २०२६-२७ चा मूळ अंदाजपत्रक मांडण्यात येणार आहे. अध्यक्षनिवडीनंतर बोलावण्यात येणाऱ्या सर्वसाधारण सभेत हा अर्थसंकल्प अवलोकनार्थ सभेपुढे ठेवला जाण्याची शक्यता आहे.

# सीबीएसई 'सिंगल गर्ल चाइल्ड' शिष्यवृत्तीसाठी अर्ज प्रक्रिया सुरु

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईने सिंगल गर्ल चाइल्ड स्कॉलरशिपसाठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. विद्यार्थी किंवा पालक सीबीएसईच्या अधिकृत वेबसाइट ललीश.सीं.ळप ला भेट देऊन ऑनलाइन अर्ज भरू शकतात. नवीन विद्यार्थ्यांसोबतच सीबीएसईने नूतनीकरण अर्जांची देखील सुरुवात केली आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थिनींना आधीच ही शिष्यवृत्ती मिळाली आहे, त्यादेखील त्यांच्या अर्जांचे नूतनीकरण करू शकतात.

पालकांची एकुलती एक मुलगी या योजनेसाठी अर्ज करू शकते. विद्यार्थिनीने दहावीत ७० टक्के गुण घेतलले असावे आणि सीबीएसईशी संलग्न शाळेत अकरावीचे शिक्षण घेत असले पाहिजे. दहावीचे शिक्षण शुल्क दरमहा २५०० रुपयांपेक्षा जास्त नसावे आणि अकरावी आणि बारावीचे शिक्षण शुल्क ३ हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. एनआरआय अर्जदारांसाठी शिक्षण शुल्क ६ हजार रुपये आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा जास्त नसावे. जर विद्यार्थिनींची या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली, तर तिला अकरावी आणि बारावीपर्यंतचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत मिळेल. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यासाठी प्रथम अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी. त्यानंतर अर्ज लिंकवर क्लिक करा. लिंकवर क्लिक केल्यानंतर वैयक्तिक, शैक्षणिक आणि बँक तपशील प्रविष्ट करावे. सर्व आवश्यक माहिती भरल्यानंतर प्रिंटआउट घ्या. अर्जासाठी शाळेकडून पडताळणी देखील अनिवार्य आहे.

# पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्यांकडून ४०१ कोटींची एफआरपी थकीत

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाच्या रास्त आणि किफायतशीर किमतीपोटी (एफआरपी) देय रकमेचा एकूण आकडा ४ हजार ४८९ कोटी १४ लाख रुपये आहे. त्यापैकी २८ फेब्रुवारीअखेरच्या ताज्या अहवालानुसार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर प्रत्यक्षात ३ हजार ९७५ कोटी ५ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तर, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या थकीत एफआरपीचा आकडा सुमारे ४०१ कोटी ८५ लाख रुपये असल्याची माहिती साखर आयुक्तालयातून मिळाली.





काही कारखान्यांनी देय एफआरपी रकमेपेक्षा अधिक रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केल्याचेही अहवालावरून दिसून येते. ही रक्कम साधारणतः ३२ कोटी रुपयांइतकी आहे. जिल्ह्यात यंदाच्या २०२५-२६ च्या हंगामात १५ कारखान्यांपैकी सद्यःस्थितीत ६ कारखान्यांनी एफआरपीची शंभर टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केलेली आहे. दौंड तालुक्यातील भीमा सहकारी हा कारखाना श्री साईप्रिया शुगर्स यांच्याकडून चालविला जातो. या कारखान्याची देय एफआरपीची रक्कम २६३ कोटी ६१ लाख रुपयांइतकी आहे. या कारखान्याने त्यातील १३४ कोटी ६२ लाख रुपयेच शेतकऱ्यांना दिलेले असून, ही रक्कम देय एफआरपीच्या केवळ ३५.५५ टक्क्यांइतकी आहे. जिल्ह्यात १२८ कोटी ९९ लाख रुपयांइतकी सर्वाधिक थकीत एफआरपी भीमा सहकारी साखर कारखान्याची आहे. याबाबत येणाऱ्या पुढील पंधरवडा अहवालात भीमा सहकारीकडून थकीत एफआरपीची रक्कम शेतकऱ्यांना दिली जाण्याची शक्यता अधिकाऱ्यांकडून वर्तविण्यात आली. असे असले तरी थकीत एफआरपीप्रश्नी साखर आयुक्तालय या कारखान्याबाबत कोणती भूमिका घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

# तेल व गॅस वितरकांनी शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे-महेश गुप्ता

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, व्यापारी आघाडी - पुणे शहर यांच्या वतीने सर्व तेल व गॅस ऑपरेटर कंपन्या, वितरक व एजन्सींना शासनाने निर्धारित केलेल्या धोरणे व मार्गदर्शक सूचनांनुसारच गॅस व इंधनाचे वितरण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, हॉटेल व्यवसाय तसेच उद्योग क्षेत्राला नियमित, पारदर्शक आणि सुरळीत पुरवठा मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत भाजपा व्यापारी आघाडी, पुणे शहरचे अध्यक्ष महेश गुप्ता यांनी व्यक्त केले.



घरगुती तसेच व्यावसायिक वापरासाठी (हॉटेल, उद्योग इ.) गॅस व इंधनाचा योग्य आणि नियमानुसार पुरवठा होणे आवश्यक असून, वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे ही सर्व वितरकांची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अवैध साठेबाजी, कृत्रिम तुटवडा निर्माण करणे किंवा काळाबाजार यांसारखे प्रकार आढळल्यास संबंधित एजन्सी व जबाबदार व्यक्तींविरुद्ध प्रशासन व पोलीस यंत्रणेकडून कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. व्यापारी वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे ही सर्व वितरकांची प्राथमिक जबाबदारी असल्याचेही महेश गुप्ता यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र साहित्य परिषदेत सत्तांतर; योगेश सोमण अध्यक्षपदी विजयी

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत राहिलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत परिवर्तन उत्कर्ष आणि साहित्य संवर्धन या दोन आघाड्यांमध्ये झालेल्या अटीतटीच्या चुरशीत अखेर साहित्य संवर्धन आघाडीने बाजी मारली. दहा वर्षांनंतर परिषेदत सत्तापालट झाला असून, साहित्य संवर्धन आघाडीने परिवर्तन घडविले. मसापच्या अध्यक्षपदी साहित्य संवर्धन आघाडीचे उमेदवार लेखक- अभिनेते योगेश सोमण, प्रमुख कार्यवाहपदी पत्रकार स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्षपदी गझलकार प्रदीप निफाडकर यांनी रविवारी (दि.१५) विजय मिळवला. तर, या निवडणुकीत परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार आणि कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांचा पराभव झाला आहे. सोमण हे आता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचेही अध्यक्ष असतील.

टिळक रस्त्यावरील साहित्य परिषदेच्या कार्यालयात मतमोजणीला रविवारी सकाळी साडेअकरा वाजता सुरुवात झाली. रात्री दहा वाजता निकाल जाहीर करण्यात आला. साहित्य परिषदेचे कार्यक्षेत्र असलेल्या पुण्यासह अकरा जिल्ह्यांत 'मसाप'चे १६ हजार ६०७ मतदार होते. यापैकी १० हजार ९०१ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. विद्यमान कार्यकारिणीचे परिवर्तन उत्कर्ष आघाडी आणि साहित्य संवर्धन आघाडीमध्ये चुरस रंगली होती. प्रत्येक फेरीदरम्यान कुणाला किती मते पडली, हे शेवटच्या क्षणापर्यंत गुलदस्त्यात ठेवण्यात आले होते. सोमण यांना ५३६५, तर मिलिंद जोशी यांना ५३२० मते पडली. केवळ ४५ मतांनी सोमण विजयी झाले. तसेच, स्वाती महाळंक यांना ५४१४ आणि सुनीताराजे पवार यांना ५२८५ इतकी मते पडली. कोषाध्यक्षपदी प्रदीप निफाडकर यांना ५५३६, तर विनोद कुलकर्णी यांना ५१६८ मते पडली. तिन्ही पदांमध्ये निफाडकर सर्वाधिक ३६८ मतांची आघाडी घेत विजयी झाले. स्थानिक कार्यवाह या सात पदांच्या निवडणुकीत सुनील महाजन, सुनेत्रा मंकणी, प्रसाद मिरासदार आणि नितीन संगमनेरकर (साहित्य संवर्धन आघाडी), तसेच अंजली कुलकर्णी, माधव राजगुरू आणि डॉ. आशुतोष जावडेकर (परिवर्तन उत्कर्ष आघाडी ) यांचा विजय झाला. निवडणुकीत १० हजार ९०१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यातील १०७१३ मते वैध आणि १८८ मते अवैध ठरली. सुरुवातीला पुणे जिल्हा प्रतिनिधिपदासाठीची मतमोजणी घेण्यात आली. पुणे जिल्हा प्रतिनिधिपदी राजन लाखे, पुरुषोत्तम काळे, प्रभाकर ओव्हाळ हे विजयी झाले. त्यानंतर सात स्थानिक कार्यवाहपदासाठीची, तसेच प्रमुख तीन पदांसाठीची मतमोजणी करण्यात आली.



# ओतूरमध्ये परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर येथील श्री संत गाडगे महाराज विद्यालयातील दहावीच्या परीक्षा केंद्रात एका अल्पवयीन विद्यार्थ्यावर वर्गात घुसून परीक्षार्थी विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला केला,या प्रसंगी हल्ल्यात जखमी झालेल्या विद्यार्थ्याने मानेवर झालेला वार हातावर झेलल्यामुळे तो बालंबाल बचावला असल्याचे जखमी विद्यार्थ्याने माहिती देताना सांगितले आहे.सदर प्रकार आज सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडला.त्यामुळे ओतूर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून जुन्या वादातून ही गंभीर घटना घडली असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे, पोलिसांनी कोयताधारी अल्पवयीन आरोपी व त्यासोबत असलेले आणखी चार विद्यार्थी यांना ताब्यात घेतले आहेत. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या तत्परतेमुळे संभाव्य गंभीर प्रकार टळला. संबंधित अल्पवयीनाकडील कोयता जप्त करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे.

